दैनिक

जनप्रभात

सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज

मुख्य संपादक :- राहुल गजरे

कार्यकारी संपादक :- अवधूत शेंद्रे

✻ (आष्टी) वर्धा ✻ बुधवार, दि.२९ डिसेंबर २०२५ ✻ वर्ष ३ रे ✻ अंक ११९ ✻ पृष्ठ ६ ✻ मुल्य ५.०० RNI NO : MAHAR/2020/82242

कोंढव्यात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या सात 'येमेनी' नागरिकांची हकालपट्टी

पुणे : कोंढव्यात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या दोन महिलांसह सात येमेन देशातील नागरिकांची हकालपट्टी करण्यात येणार आहे. पुणे पोलिसांच्या परकीय नागरिक नोंदणी विभागाने (एफआरओ) ही कारवाई केली. शहरात शिक्षण, व्यवसाय, तसेच उपचारांसाठी मोठ्या संख्येने परदेशातील नागरिक वास्तव्यास येतात. काही परदेशी नागरिक व्हिस्साची मुदत संपल्यानंतर बेकायदा वास्तव्य करतात. शहरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या परदेशी नागरिकांवर कारवाई करण्याचे आदेश पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी नुकतेच दिले. त्यानंतर परकीय नागरिक नोंदणी विभागाने परकीय नागरिकांची तपासणी सुरू केली. कोंढव्यातील एनआयबीएम रस्त्यावरील एका सोसायटीत वास्तव्यास असलेल्या दोन महिलांसह सात येमेनी नागरिकांची व्हिस्साची मुदत संपल्याचे लक्षात आले. त्यानंतर पोलिसांच्या पथकाने त्यांना देश सोडून जाण्याची नोटीस (लिव्ह इंडिया नोटीस) बजाविली असून, त्यांची लवकरच हक्कालपट्टी केली जाणार आहे, अशी माहिती परकीय नागरिक नोंदणी विभागातील अधिकाऱ्यांनी दिली.

पीक नुकसान मदतीच्या वाटपासाठी उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत शंभर दिवसात करावयाच्या कामांचा आढावा;ई पंचनामा प्रकल्पाची प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणी करावी



मुंबई, दि. २७ :- नैसर्गिक आपत्तीमुळे बाधीत शेतकऱ्यांना तातडीने मदत मिळावी, यासाठी जिल्हा प्रशासनाने समन्वय साधून पीक नुकसान मदतीचे वाटप करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशा सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या.

मदत व पुनर्वसन आणि आपत्ती व्यवस्थापन विभागामार्फत शंभर दिवसात करावयाच्या कामकाजाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सह्याद्री अतिथीगृह येथील बैठकीत घेतला.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, नैसर्गिक आपत्तीमुळे शेत पिकांचे नुकसान झाल्याने शेतकरी संकटात सापडतात. यातून सावरण्यासाठी शासन मदत जाहीर करते. शासनाने जाहीर केलेली मदत त्यांना तातडीने मिळावी, यासाठी संबधित शेतकऱ्यांचे इ केवायसी प्रक्रिया तातडीने करून त्यांना थेट मदत दिली जावी. ई पंचनामा प्रकल्पाची प्रायोगिक तत्वावर अंमलबजावणी करण्यात यावी.

अमरावती आणि नाशिकमध्ये पूनर्वसन प्राधिकरण कार्यान्वित करण्याबरोबरच अतिरिक्त ८ प्राधिकरणांसाठी मंत्री मंडळासमोर प्रस्ताव आणावा. १९७६ पूर्वी पुनर्वसन झालेल्या गावांसाठी दिलेल्या वस्तीमध्ये नागरी सुविधांची कामे पूर्ण करून ती ग्रामविकास विभागाकडे वर्ग करण्याबाबतही प्रस्ताव तयार करावा, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

राज्य आपत्कालीन प्रतिसाद केंद्र व जिल्हा आपत्कालीन प्रतिसाद केंद्रांचे अद्ययावतीकरण करावे. कोकण आपत्ती सौम्यीकरण व इतर महाराष्ट्रातील सौम्यीकरण प्रकल्पांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही त्यांनी यावेळी दिल्या.

बैठकीस जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण पाटबंधारे मंडळ) व आपत्ती. व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मुख्यमंत्री यांचे अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे, प्रधान सचिव अश्विनी भिडे, सचिव डॉ. श्रीकर परदेशी, मदत व पुनर्वसन विभागाच्या अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, पर्यावरण विभागाच्या प्रधान सचिव विनिता वेदसिंगल, मत्स्यव्यवसाय सचिव डॉ. रामस्वामी एन. आदी उपस्थित होते. मदत व पुनर्वसन व आपत्ती व्यवस्थापन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सोनिया सेठी यांनी सादरीकरण केले.

'डेटिंग ॲप'वरील ओळखीतून व्यावसायिकाला लुटणारा अटकेत

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : डेटिंग ॲपवर झालेली ओळख व्यावसायिकाला महागात पडली. व्यावसायिकाला धायरी भागातील निर्जन ठिकाणी बोलावून शस्त्राच्या धाकाने लुटण्यात आले. नांदेड सिटी पोलिसांनी याप्रकरणाचा तपास करुन एका तरुणासह अल्पवयीन साथीदारांना पकडले. याप्रकरणी भारत किसन धिंडले (वय १८, रा. धायरी) याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याबरोबर असलेल्या तीन अल्पवयीन साथीदारांना ताब्यात घेण्यात आले. याबाबत एका व्यावसायिकाने फिर्याद दिली होती. ही घटना १४ जानेवारी रोजी रात्री आठच्या सुमारास धायरीतील डीएसके विश्व परिसरातील एका शाळेजवळ घडली होती.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी व्यावसायिक आणि आरोपीची एका डेटिंग ?पवरुन ओळख झाली होती. आरोपी धिंडलेने व्यावसायिकाशी ओळख वाढवून त्याला १४ जानेवारी रोजी धायरीतील डीएसके विश्व रस्त्यावर बोलाविले होते. व्यावसायिक तेथे गेला. त्याला धिंडले आणि त्याच्याबरोबर तीन अल्पवयीन साथीदारांनी शस्त्राचा धाक दाखविला. त्याच्याकडील सोन्याची बाळी, मोबाइल संच आणि रोकड असा मुद्देमाल लुटून चौघे जण पसार झाले. या घटनेनंतर घाबरलेल्या व्यावसायिकाने नांदेड सिटी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

धायरी परिसरात डीएसके विश्व रस्त्यावर नागरिकांना लुटण्याचे प्रकार वाढीस लागले आहेत, असा संदेश समाज माध्यमातून प्रसारित झाला होता. त्यानुसार पोलिसांच्या पथकाने या भागातील गस्त वाढविली होती. व्यावसायिकाला लुटणारा आरोपी धिंडले तेथे थांबला होता. गस्त घालणारे पोलीस कर्मचारी पुरुषोत्तम गुन्ला आणि अक्षय जाधव यांनी त्याला पाहिले. सापळा लावून त्याला पोलिसांनी पकडले. चौकशीत धिंडले आणि साथीदारांनी १४ जानेवारी रोजी व्यावसायिकाला लुटल्याची कबुली दिली. पोलीस उपायुक्त संभाजी कदम, सहायक आयुक्त भाऊसाहेब पटारे यांच्या मार्गदर्शनाखाली नांदडे सिटी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक अतुल भोस, उपनिरीक्षक शिवाजी बुनगे, पुरुषोत्तम गुन्ला, योगेश झेंडे, राजू वेगरे, प्रशांत काकडे, मोहन मिसाळ यांनी ही कारवाई केली.

धक्कादायक! विद्यार्थिनीवर बलात्कार आणि खून करण्यासाठी विद्यार्थ्याने दिली १०० रुपयांची सुपारी

वृत्तसंस्था ■ पुणे

पुणे : पुणे जिल्ह्यातील दौंड तालुक्यातील एका नामांकित शाळेतील इयत्ता ७ वी मध्ये शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थिनीवर तिच्याच वर्गातील मुलाने दुसऱ्या वर्गातील मुलाला तिच्यावर बलात्कार आणि खून करण्यासाठी १०० रुपयांची सुपारी दिल्याचा प्रकार घडला आहे. प्रकरण दडपण्याचा प्रयत्न करणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापकासह दोन शिक्षकांवर दौंड पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

लिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दौंड येथील एका नामांकित शाळेतील एका विद्यार्थ्याने प्रगतीपुस्तकावर पालकांची खोटी सही केली. हा प्रकार त्याच्याच वर्गातील मुलीने पाहिला. या प्रकाराबाबत पीडित मुलीने शिक्षकांना सांगितले. शिक्षकांकडे तक्रार केल्याचा राग मनात धरून त्या मुलाने दुसऱ्या वर्गातील मुलाला तक्रार करणाऱ्या मुलीवर बलात्कार कर आणि त्यानंतर तिचा खून करायचा, या कामासाठी तुला १०० रुपये देत असल्याचे त्याने सांगितले. त्यानंतर त्या मुलाने त्याला बलात्कार आणि खून करण्यासाठी १०० रुपयांची सुपारी दिल्याचे त्याने पीडित मुलीस जाऊन सांगितले. त्यानंतर पीडित मुलीने शाळेतून घरी गेल्यावर कुटुंबियांना हा प्रकार सांगितला. त्यावर शाळेतील शिक्षक आणि मुख्याध्यापक यांच्याकडे संबधित मुलाबाबत तक्रार देण्यास कुटुंबीय गेले. पण उलट पीडित मुलीवर त्यांनी वेगवेगळे आरोप करून हे प्रकरण दडपण्याचा प्रयत्न केला. या घडामोडीनंतर पीडित मुलीचे आई वडील आमच्याकडे तक्रार देण्यास आल्यावर संबधित शाळेच्या मुख्याध्यापकासह दोन शिक्षकांवर गुन्हा दाखल केला असून त्यांच्याकडे चौकशी सुरू आहे. तर या प्रकरणातील मुलास बाल न्याय मंडळासमोर लवकरच हजर केले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

राज्यात आर्टीफिशियल इंटेलिजन्स (कृत्रिम बुद्धिमत्ता) विद्यापीठाची होणार स्थापना : उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील

कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठासंदर्भात समिती गठीत करण्याचे आदेश

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : विकसित भारत २०४७ मिशनच्या यशस्वी पूर्ततेसाठी आणि भारताच्या ५ ट्रिलियन अर्थव्यवस्थेच्या दिशेने वाटचालीसाठी शिक्षण आणि तंत्रज्ञान यांची महत्त्वपूर्ण भूमिका आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्रात कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ लवकरच स्थापन करण्यात येणार आहे. यासाठी समिती गठीत करण्याच्या सूचना उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिल्या.

मंत्रालयात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, माहिती व तंत्रज्ञान मंत्री ?ड.आशिष शेलार यांच्या उपस्थितीत बैठक झाली. या बैठकीला उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव, बी वेणूगोपाल रेड्डी, माहिती तंत्रज्ञान प्रधान सचिव पराग जैन-नैनुटीया, उपसचिव अशोक मांडे, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ.प्रमोद नाईक उपस्थित होते.

उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता विद्यापीठ स्थापन करण्यासाठी समिती गठीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. अत्याधुनिक संशोधन आणि तंत्रज्ञान यांच्या सहाय्याने विद्यार्थ्यांना आणि तरुणांना आवश्यक आधुनिक माहिती तंत्रज्ञानाचे आणि जागतिक स्पर्धेत सक्षम ठेवणारे ज्ञान उपलब्ध होईल असे विद्यापीठ असावे.

माहिती व तंत्रज्ञान मंत्री ?ड.आशिष शेलार म्हणाले, आर्टीफिशियल इंटेलिजन्स हे तंत्रज्ञान भविष्याच्या दृष्टीने फार महत्त्वाचं आहे. एआय किंवा संबंधित क्षेत्रांवर प्रभुत्व मिळविल्यास मोठ्या आणि फायदेशीर रोजगाराच्या संधी मिळू शकतात. या पार्श्वभूमीवर देशात पहिल्या एआय विद्यापीठाची स्थापना होईल.

यासंदर्भात एक विशेष कृतीदल (टास्क फोर्स) स्थापन करण्यात आले आहे. यामध्ये उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे अपर मुख्य सचिव, बी वेणूगोपाल रेड्डी, माहिती तंत्रज्ञान प्रधान सचिव पराग जैन-नैनुटीया, तंत्र शिक्षण संचालक डॉ. विनोद मोहितकर, उच्च शिक्षण संचालक शैलेंद्र देवळाणकर, राज्य तंत्र शिक्षण मंडळाचे संचालक डॉ.प्रमोद नाईक, परेश पागे यांचा समवेश आहे.

मलेशियासोबत सांस्कृतिक आणि व्यापारी संबंध वृद्धींगत करण्यात महाराष्ट्राचा पुढाकार : राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : महाराष्ट्र आणि मलेशियादरम्यान विविध सांस्कृतिक बाबींमध्ये समानता आहे. महाराष्ट्र कृषी उत्पादने, पर्यटन अशा विविध क्षेत्रांमध्ये आघाडीवर असून सांस्कृतिक आणि व्यापारी क्षेत्रातील परस्पर संबंध वृद्धींगत करण्यासाठी महाराष्ट्र मलेशियाचे स्वागत करेल, असे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांनी सांगितले.

मलेशियाचे महावाणिज्य दूत अहमद झुवारी युसूफ यांनी मंगळवारी राज्याचे राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल यांची सह्याद्री अतिथीगृह येथे सदिच्छा भेट घेतली. वाणिज्य दूतावासातील मो.स्यारकावी यावेळी त्यांच्यासमवेत उपस्थित होते.

मंत्री श्री.रावल यांनी समृद्धतेने नटलेल्या महाराष्ट्रातील विविध बाबींची श्री.युसूफ यांना माहिती दिली. नाशिकचा कांदा आणि द्राक्षे, कोकणचा जगप्रसिद्ध हापूस आंबा, महाबळेश्वरची स्ट्रॉबेरी, सह्याद्रीच्या रांगांमधील सुगंधी इंद्रायणी तांदूळ, ताजी फळे, भाजीपाला अशा विविध उत्पादनांची निर्यात महाराष्ट्रातून होत असते. मलेशियाला निर्यात करण्याबाबत महाराष्ट्र सकारात्मक असून मलेशियाने यांची आयात करण्यासाठी पुढाकार घ्यावा, महाराष्ट्राच्यावतीने त्यांचे स्वागत आणि संपूर्ण सहकार्य करण्यात येईल, असे त्यांनी सांगितले.

महाराष्ट्र पर्यटन स्थळांनी समृद्ध आहे. पर्यटनाच्या माध्यमातून संस्कृतीचा विस्तार होतो. मलेशियाच्या पर्यटकांनी राज्यात पर्यटनासाठी यावे, असे आवाहन मंत्री श्री.रावल यांनी केले. महाराष्ट्र आणि मलेशियादरम्यान सांस्कृतिक, आणि व्यापारी संबंध अधिक दृढ होण्यासाठी मलेशियाच्या कृषी आणि पर्यटन विषयक सदस्यांनी महाराष्ट्राला भेट देण्याचे निमंत्रणही त्यांनी दिले.

मलेशियाच्या महावाणिज्यदूतांनी यावेळी परस्पर संबंध वृद्धींगत करण्यासाठी मलेशिया करीत असलेल्या प्रयत्नांची माहिती दिली.

सफाई कामगारांना वारसा हक्काने नियुक्तीच्या आदेशाची अंमलबजावणी करावी : सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने ८ जानेवारी २०२५ रोजी दिलेल्या आदेशान्वये सफाई कामगारांच्या वारसांना वारसा हक्काने देण्यात येणाऱ्या नियुक्तीवरील स्थगिती उठविली आहे. त्यामुळे सफाई कामगारांना वारसा हक्काने नियुक्ती मिळण्याचा मार्ग मोकळा झाला असून या आदेशाची अंमलबजावणी करण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी दिले आहेत.

लाड समितीच्या शिफारशींच्या अनुषंगाने सफाई कामगारांना वारसा हक्काने नियुक्तीबाबत दि. २४ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयान्वये सुधारीत तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत. या निर्णयान्वये सफाई कामगारांच्या व्याख्येत बसणाऱ्या सर्व सफाई कामगारांना लाभ देण्याचा निर्णय शासनाने घेतला. तथापि, उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दाखल विविध याचिकांच्या अनुषंगाने पुढील आदेश होईपर्यंत वाल्मिकी, मेहतर, भंगी, अनुसूचित जाती व नवबौद्ध या समुदायातील व्यक्ती वगळता इतर सफाई कामगारांना वारसा हक्काने नियुक्ती देण्यास स्थगिती दिली.

उच्च न्यायालयाचे ८ जानेवारी २०२५ चे आदेश विचारात घेऊन २४ फेब्रुवारी २०२३ च्या शासन निर्णयान्वये तसेच त्यानुषंगाने वेळोवेळी विहीत केलेल्या शासन निर्णय व सुधारणा, शुध्दीपत्रकातील तरतुदीस अनुसरुन तात्काळ कार्यवाही करण्याचे निर्देश सामाजिक न्याय मंत्री श्री. शिरसाट यांनी सर्व विभागांना तसेच राज्यातील सर्व आयुक्त, महानगरपालिका, आयुक्त तथा संचालक, नगरपरिषद प्रशासन संचालनालय आणि आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांना निर्देश दिले आहेत. कोणत्याही सफाई कामगारांवर वारसा हक्क नियुक्तीच्या अनुषंगाने अन्याय होणार नाही, याची खबरदारी घेण्याच्या सूचना श्री. शिरसाट यांनी दिल्या आहेत.

कॉर्पोरेट क्षेत्राच्या सहकार्यावर आधारित दिव्यांग कल्याणाचे धोरण तयार करावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

पुढील १०० दिवसांमध्ये दिव्यांग कल्याण विभागाने करावयाच्या कामांचा घेतला आढावा

वृत्तसंस्था ■ मुंबई



मुंबई : दिव्यांग आपल्या शारीरिक व्यंगामुळे समाजात अनेक वेळा हीनतेच्या भावनेचा अनुभव घेत असतो. दिव्यांगाना सर्वतोपरी मदत करून समाजाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी शासन वेळोवेळी निर्णय घेते आहे. दिव्यांग कल्याणासाठी कॉर्पोरेट क्षेत्रातील मान्यवर सहकार्य करण्यास इच्छुक असतात. त्यांच्या मदतीचा दिव्यांगांच्या कल्याणासाठी पुरेपूर उपयोग व्हावा याकरिता कॉर्पोरेट क्षेत्राच्या सहकार्यावर आधारित धोरण तयार करावे, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे दिव्यांग कल्याण विभागाच्या पुढील १०० दिवसांच्या आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी आढावा घेतला.

दिव्यांगासाठी स्वतंत्र विभाग सुरू करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचे सांगत मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, दिव्यांग विभागाअंतर्गत असलेल्या अनुदानित विशेष शाळा व कार्यशाळा यामध्ये आधार कार्डसाठी विशेष मोहीम राबविण्यात यावी. अनुदानित विशेष शाळा, कार्यशाळांमध्ये विद्यार्थी व कर्मचाऱ्यांसाठी आधार संलग्न बायोमेट्रिक हजेरी प्रणाली सुरू करावी. विविध शासकीय योजनांचा दिव्यांगांना लाभ मिळण्यासाठी वैश्विक ओळखपत्र (ऊअध्ड-कार्ड) अत्यावश्यक आहे. या ओळखपत्राचे वाटप करण्यासाठी राज्यात विशेष मोहिमेचे आयोजन करावे.

शालांतपूर्व शिष्यवृत्ती योजना व दिव्यांग व्यक्ती विवाह योजना डिबीटी प्रणालीद्वारे राबविण्यात येणार आहेत. नमो दिव्यांग शक्ती अभियान योजनेअंतर्गत उर्वरित जिल्ह्यांमध्ये दिव्यांगासाठी पुनर्वसन केंद्र तातडीने सुरू करण्याच्या सूचनाही मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी दिल्या.

बैठकीत दिव्यांग कल्याण विभागाचे अपर मुख्य सचिव अनिल डिग्गीकर यांनी सादरीकरणाच्या माध्यमातून विभागाचा आराखडा सादर केला. तसेच येत्या शंभर दिवसात विभागाकडून करण्यात येणाऱ्या कामांची सविस्तर माहिती दिली.

बैठकीस पर्यावरण मंत्री पंकजा मुंडे, क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे, मदत व पुनर्वसन मंत्री मकरंद जाधव पाटील, मत्स्यव्यवसाय मंत्री नितेश राणे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, मदत व पुनर्वसन व विभागाच्या अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, मुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, मुख्यमंत्र्यांच्या प्रधान सचिव अश्विनी भिडे, मुख्यमंत्र्यांचे सचिव डॉ.श्रीकर परदेशी तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

छत्रपती संभाजीनगर येथे बिबट्याच्या हल्ल्यात बालकाचा मृत्यू

वृत्तसंस्था ■ छ.संभाजीनगर



छत्रपती संभाजीनगर : आईसोबत कापूस वेचणीसाठी शेतात गेलेल्या ९ वर्षीय बालकाचा बिबट्याच्या हल्ल्यात जागीच मृत्यू झाला. ही घटना वैजापूर तालुक्यातील कविटखेडा-बिरोळा शिवारात बुधवारी सकाळी ११ च्या सुमारास घडली. महेश सिद्धार्थ आखाडे (मूळ रा. बडवाणी मध्यप्रदेश) असे हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या बालकाचे नाव आहे.

याप्रकरणी शिऊर पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार येथील शेतकरी मच्छिंद्रकाशिनाथ चव्हाण यांच्या गट न. १३३ मधील शेतात कापूस वेचणीचे काम सुरू होते. मृत महेश हा आईसमवेत शेतात आला होता. दरम्यान महेश गायब झाल्याचे आईच्या निदर्शनात आले. यानंतर शेतातील परिसरात शोध घेत असतानाच काही अंतरावर महेश मृतावस्थेत आढळून आला. या घटनेची माहिती स्थानिकांनी पोलिसांना दिली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला व महेशचा मृतदेह शवविच्छेदनासाठी शिऊर प्राथमिक आरोग्य केंद्रात पाठवला.

हल्ल्यांची मालिका

गेल्या महिनाभरात शिऊरसह, लोणी, गारज परिसरात बिबट्याने २ ते ३ पुरुष व महिला, ३ बालकांसह अनेक जनावरांवर हल्ला केल्याच्या घटना घडल्या असल्याचे स्थानिक ग्रामस्थांकडून सांगितल्या जात आहेत.

संपादकीय...

सीतारामन 'सिंग' होतील...

रुपया सावरण्यात रिझर्व्ह बँकेची दमछाक, वाढीची उमेद गमावलेले उद्योग, ६० टक्के लोकसंख्येस मोफत शिधा अशा संकटांतच संधीचीही आशा असते.अर्थसंकल्पपूर्व आठवड्यात भांडवली बाजाराचे सातत्याने कोसळणे हे कोणत्याही दृष्टिकोनातून पाहिले तरी नकारात्मकच ठरते. भांडवली बाजार आणि देशाची अर्थव्यवस्था यांच्यात काहीही सांगड नसते हे खरे. पण भावनिक भांडवली बाजारास येणाऱ्या काळाची चाहूल लागत असते हेही खरे. त्यामुळेच ही बाजाराची घसरण एकंदर अर्थव्यवस्थेची अपेक्षाशून्यता दर्शवते. गेली काही वर्षे भारताने जगातील सर्वात वेगाने वाढणारी मोठी अर्थव्यवस्था असल्याची शेखी मिरवली. ती योग्यच होती. कारण युरोपने मान टाकलेली आणि चीन मंदावलेला. अशा अवस्थेत वासरात लंगडी गाय शहाणी ठरावी तसे आपण प्रगतीचा मानदंड ठरत गेलो. त्यात जगातील पहिल्या पाचांत असण्याचे इरादे, दुसरा क्रमांक लवकरच गाठण्याच्या आणाभाका आणि २०४७ सालापर्यंत भारत विकसित होणार असल्याची द्वाही यामुळे सगळ्या वातावरणात आशावाद ठासून भरलेला होता. किंबहुना तसा तो भरलेला राहील, असेच समस्त व्यवस्थेचे प्रयत्न होते. ते काही काळ यशस्वी ठरलेदेखील. पण स्वतःचा विकासाचा वेग सातत्याने राखण्यासाठी इतरांनी मंदावणे इतकेच पुरेसे नसते. त्यामुळे झाले असे की विविध जागतिक वित्तीय संघटना, आंतरराष्ट्रीय नाणेनिधीपासून ते आपल्या रिझर्व्ह बँकेपर्यंत सगळ्यांनीच भारताच्या विकासदराचा अंदाज कमी कमी करायला सुरुवात केली. हे कमी म्हणून की काय अमेरिकेत डोनाल्ड ट्रम्प यांचे सत्तारूढ होणे आणि त्यांनी त्यांच्या पद्धतीने वॉशिंग्टनची कुऱ्हाड सपासप चालवणे सुरू झाले. परिणामी बाजार आणखी बिथरला. या पार्श्वभूमीवर जागतिक पातळीवर अर्थविकासाचे आशेचे एकमेव केंद्र म्हणून भारताकडे पाहणारेही भारताविषयी चिंता व्यक्त करू लागलेले दिसतात. यात विद्यामान केंद्र सरकारचे समर्थक गणले जाणारे वित्तवेत्तेही आहेत, ही बाब महत्त्वाची. केंद्रीय अर्थसंकल्प चार दिवसांवर आलेला असताना या वास्तवाची दखल घेणे आवश्यक ठरते.त्यात पहिल्या क्रमांकावर आहे रुपयाचे निरंतर घसरणे. एकेकाळी रुपयाची किंमत डॉलरच्या तुलनेत ६० रुपयांस स्पर्श करू लागली की बॉलीवूडच्या तारेतारकांपासून अर्थयोगतज्ज्ञ बाबा-बापूंपर्यंत सर्व चिंता व्यक्त करू लागत. त्यातले काही वाचाळ रुपयाच्या घसरण्यासाठी अर्थतज्ज्ञ पंतप्रधान मनमोहन सिंग यांस बोल लावत. आता रुपया ८५ चा टप्पा पार करून ८६ ला स्पर्श करून आला तरी हा वर्ग हूं की चूं करताना दिसत नाही. केंद्राच्या आध्यात्मिक ताकदीची जाणीव हे या एकेकाळच्या बोलघेवड्या वर्गाच्या मौनामागचे कारण असावे. पण हा वर्ग दिवसागणिक नवनवा तळ गाठणाऱ्या रुपयाबाबत शांत होता तरी रिझर्व्ह बँक आपली सर्व ताकद पणास लावून रुपयाचे घसरणे थांबवण्याच्या प्रयत्नात होती. ते प्रयत्न काही प्रमाणात अंगाशी आले. याचे कारण आपल्या तिजोरीतले डॉलर्स पणास लावून रुपयाचे मूल्य राखण्याच्या प्रयत्नात रिझर्व्ह बँकेने आपल्या तिजोरीतील २०,००० ते २२,००० कोटी डॉलर्स (२०० ते २२० बिलियन डॉलर्स) रकमेची माती केली. आणि इतके करूनही डॉलरचे वधारणे काही थांबलेले नाही. म्हणजे रुपयाचे आणखी अवमूल्यन अटळ. त्यात ट्रम्प यांच्या सत्तारोहणानंतर त्या देशातील व्याजदरांतही वाढ होऊ लागल्याने अनेक जण आपल्या बाजारातील गुंतवणूक काढून अमेरिकेत करू लागले. म्हणजे रुपयाच्या मूल्यावर आणखी दबाव येत असताना रिझर्व्ह बँकेस रुपयाची मुक्त घसरण पाहण्याखेरीज आणखी काही करण्याची सोयही नाही. जे करायचे होते ते संकट तीव्र व्हायच्या आधीच करून झाले आणि केलेले सर्व वाया गेले. बाजार सलग घसरताना दिसतो त्याचे कारण हे.त्याच वेळी नवीन गुंतवणुकीबाबत मात्र आपले उद्योगपती हातावर हात घेऊन शांत बसलेले दिसतात. त्यांचेही बरोबर म्हणायचे. कारण गुंतवणूक करा, हात सैल सोडा या अर्थमंत्र्यांच्या आवाहनापलीकडे गुंतवणुकीसाठी आवश्यक धोरणसातत्य अजिबात नसल्याने ते तरी काय करणार. अलीकडे केंद्र सरकारचेच अर्थसल्लागार अनंत नागेश्वरन यांनी एका परीने केंद्राच्या धोरणावरच टीका केली जेव्हा त्यांनी "आम्ही आमच्या हाताने कारखानदारी मोडीत काढू लागलेलो आहोत" अशा अर्थाचे विधान केले. नागेश्वरन यांचा रोख होता कालबाह्य अशा जमीन हस्तांतरविषयक कायद्यांवर. आज आपल्या देशात उद्योगांची निम्म्यापेक्षा अधिक ऊर्जा जमिनीपासून सर्व परवाने मिळवण्यातच जाते. या कायद्यांत सुधारणेची गरज धोरणकर्त्यांनी अनेकदा व्यक्त केलेली आहे. पण ते तेवढ्यापुरतेच. नुसती शब्दसेवा. प्रत्यक्ष कृतीच्या नावे भोपळा. तीच बाब कामगार कायद्यांबाबतही. अनेक राज्यांत त्यांची अंमलबजावणीची सुरुवातही नाही आणि ती व्हावी यासाठी केंद्र सरकार काही करतानाही दिसत नाही. एरवी राज्यांच्या अधिकारांवर ऊठसूट अतिक्रमण करणारे केंद्र सरकार औद्योगिक प्रगतीसाठी या महत्त्वाच्या विषयावर मात्र बघ्याची भूमिका घेते. कारण? राजकीय परिणामांची भीती. आपण कामगारविरोधी दिसू वा ठरवले जाऊ या भीतीने केंद्र सरकार कामगार कायद्यांतील सुधारणा अमलात आणत नसून त्याचा मोठा फटका उद्योगांच्या विस्तारास बसताना दिसतो. आज एखाद्या भव्य प्रकल्पाची उभारणी हाती घेण्याऐवजी अनेक उद्योजक १०० पेक्षा कमी कामगार नेमावे लागतील याची खबरदारी बाळगून अनेक छोटे कारखाने काढण्यास प्राधान्य देतात. म्हणजे हजारभर कामगारांस रोजगार मिळेल असा कारखाना काढण्याऐवजी ९९ जणांना घेऊन १० लहान-लहान कारखाने काढणे. असे केल्याने जमीन हस्तांतरही सुलभ होते आणि कामगार कायद्यातील पळवाटांचाही आधार घेता येतो. उद्योजकांसाठी ही सोय असेल. पण असे केल्याने राज्याचे नुकसान होते. याचा अर्थ २४ वर्षांच्या एका तगड्या पैलवानास चार-चार वर्षांची सहा बालके हा पर्याय असू शकत नाही. हे केंद्र सरकारला जेवढ्या लवकर कळेल तितके बरे.या सगळ्याच्या जोडीने राजकीय दबावापोटी लोकानुनयाची सुरू झालेली स्पर्धा. ती कमी होण्याची चिन्हे नाहीत. कारण पार्लमेंटपासून पंचायतीपर्यंत प्रत्येक निवडणूक आपण आणि आपणच जिंकायला हवी, ही ईर्षा. तत्त्वतः ईर्षा वाईट नाही. पण त्याची किंमत काय आणि कोण चुकती करणार हा प्रश्न. नागरिकांचा रोष नको म्हणून केंद्राने करोनाकाळात सुरू केलेली मोफत धान्य योजना अद्यापही बंद केलेली नाही. उलट तिची व्याप्ती वाढवत नेली. आज जवळपास ८० कोटी नागरिकांस हे मोफत धान्य दिले जाते. म्हणजे देशाच्या लोकसंख्येच्या साधारण ६० टक्के नागरिकांस याचा फायदा मिळतो. तेही एक वेळ क्षम्य. पण एका बाजूने आर्थिक महासत्ता होत असल्याच्या वल्गना करायच्या आणि ८० कोटी जनतेस मोफत शिधावाटप करायचे यातील विरोधाभास सरकार विचारात घेत नाही, ही बाब अक्षम्य. कारण इतक्या जणांस मोफत शिधावाटप अद्यापही करावे लागत असेल तर अर्थविकासाचे सिंचन सर्वदूर समप्रमाणात झालेले नाही, असा त्याचा अर्थ.आगामी अर्थसंकल्पात या सगळ्याचा विचार निर्मला सीतारामन यांस करावा लागेल. देशातील आर्थिक आव्हानांस आता ट्रम्प यांच्या रूपाने जागतिक संकटाची जोड मिळालेली असल्याने आपली परिस्थिती अधिक गंभीर ठरते. हा असा संकटकाल नव्या संधींचा. त्याचे अलीकडच्या काळातील ताजे उदाहरण म्हणजे १९९१ साली पंतप्रधान नरसिंह राव यांनी तत्कालीन अर्थमंत्री मनमोहन सिंग यांस हाताशी धरून रेटलेल्या सुधारणा. विद्यामान अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्यासमोर ही सुधारणा संधी चालून आली असून ती त्या साधणार का, यावर देशाच्या अर्थव्यवस्थेची दिशा आणि वेग अवलंबून असेल. म्हणून सीतारामन या सिंग होणार का, हा प्रश्न.

!!! जॉर्ज दी जायंट किलर !!!

(२९ जानेवारीः जॉर्ज फर्नांडिस पुण्यस्मरण/ स्मृतिदिन विशेष)



जॉर्ज मॅथ्यू फर्नांडिस हे कामगारनेते, पत्रकार आणि संसदपटू असलेले जॉर्ज फर्नांडिस भारताच्या समाजवादी चळवळीतील महत्त्वाचे नेते आहेत. ते जनता दल-संयुक्त पक्षातील एक ज्येष्ठ होते. याशिवाय त्यांनी १९९४ साली नितीश कुमार ह्यांच्या सोबत समता पक्षाची स्थापना केली होती. केंद्रीय मंत्री या नात्याने उद्योग, रेल्वे आणि संरक्षण या खात्यांसह अनेक खात्यांचा कार्यभार त्यांनी सांभाळला आहे. महत्त्वपूर्ण संकलित लेख श्री कृष्णकुमार लक्ष्मी-गोविंदा निकोडे गुरूजींच्या शब्दशैलीतून... संपादक.

जॉर्ज फर्नांडिस हे मुंबईत स.का.पाटलांना पराभूत केल्यानंतर ठरले होते जॉर्ज दी जायंट किलर! जॉर्ज फर्नांडिस नावाचे वादळ मंगळवारी सकाळी शांत झाले. या समाजवादी नेत्याच्या एका हाकेवर अख्खी मुंबई थांबायची! कामगारांचे नेते म्हणून जॉर्ज प्रसिद्ध होते. ते पत्रकारही होते. सर्वात महत्त्वाचे म्हणजे जॉर्ज नगरसेवक ते देशाचे संरक्षण मंत्री असा प्रवास केलेले नेते होते. त्यांचा हा प्रवास थक्क करणारा आहे. अल्झायमर आणि पार्किन्सन्स सारख्या आजाराने ते दीर्घकाळापासून अंथरुणाला खिळलेले होते. सन १९५०च्या सुरुवातीला ते टॅक्सी ड्रायव्हर यूनियनचे बेताज बादशाह झाले. अस्ताव्यस्त केस, सडपातळ अंगयष्टी, जाडाभरडा खादीचा कुर्ता-पायजामा, घासून गुळगुळीत झालेली चप्पल आणि डोळ्यांवर चष्मा असा जॉर्ज यांचा वेष असायचा. ते कामगारांमध्ये कामगार होऊन जात. त्यामुळे कामगारांमध्ये त्यांच्याबद्दल प्रचंड कुतूहल आणि आपलेपणा होता. मध्यमवर्गीय आणि उच्च मध्यमवर्गीय यांच्यात जॉर्ज हे मुंबईचे बेताज बादशाह आणि मुंबई बंद पाडणारा डॅशिंग नेता होते, तर मुंबईच्या झोपडपट्टीत राहाणाऱ्यांसाठी आणि कामगारांसाठी ते हिरो होते. सन १९६७मध्ये लोकसभा निवडणुकीत दक्षिण मुंबईतून त्यांनी काँग्रेसच्या स.का.पाटील यांना नुसते आव्हान उभे केले नाही, तर पाटलांना त्यांनी मात दिली. त्यानंतर त्यांना 'जॉर्ज दी जायंट किलर' म्हटले जाऊ लागले.

सन १९७३मध्ये ऑल इंडिया रेल्वेमेंस फेडरेशनच्या चेअरमन पदी जॉर्ज फर्नांडिस यांची निवड झाली. त्यावेळी भारतीय रेल्वेत चौदा लाख कर्मचारी होते. म्हणजे भारताच्या एकूण संघटीत क्षेत्रातील ७ टक्के ही लोकसंख्या होती. जॉर्ज यांनी दि.८ मे १९७४ला देशव्यापी संप पुकारला होता. रेल्वेचा चक्का जाम झाला. कित्येक दिवस रेल्वेचे काम ठप्प होते. तीन आठवड्यानंतर सरकारने मिलटरी बोलावून संप चिरडला. कर्मचाऱ्यांना रेल्वे क्वॉर्टरमधून बेदखल केले, नोकरीवरुन काढले. तेव्हा इंदिरा गांधी पंतप्रधान होत्या, त्यानंतर कामगार, कष्टकऱ्यांनी इंदिरा गांधींना कधीही स्वीकारले नाही. आणीबाणी जाहीर झाली तेव्हा जॉर्ज ओडिसामध्ये होते. रेडिओवर त्यांना आणीबाणीची माहिती मिळाली. त्यांना कल्पना होती की सरकारच्या निशाण्यावरील पहिल्या पंक्तितील आपण एक असणार आहोत. त्यामुळे ते भूमिगत झाले. आणीबाणीविरोधात आंदोलन उभे केले. साधू, मासेमार बनून ते फिरले. या काळात दाढी-केस वाढले आणि त्यांनी सरदारजीचा वेष घेतला आणि आपले काम करत राहिले. जॉर्ज आणि त्यांच्या काही सहकाऱ्यांनी आणीबाणीच्या काळात सरकारी कार्यालय, मैदान, इंदिरा गांधी, संजय गांधी यांच्या सभा उधळून लावण्यासाठी स्फोट घडवण्याची योजना आखली होती. त्यासाठी बडोद्याहून डायनामाइटही मागवले असल्याची माहिती होती. त्यांच्या योजनेचे बिंग फुटले आणि जून १९७६मध्ये जॉर्जसह २५ जणांना अटक झाली. या सर्वांची सीबीआय चौकशी सुरु झाली. जॉर्ज यांना अटक केल्यानंतर अक्षरशः साखळदंडाने बांधून त्यांना नेण्यात आले. त्यांच्या भावावर पोलिसांनी एवढे अत्याचार केले, की दोन्ही पाय निकामी झाले. जनता पार्टीचे सरकार आल्यानंतर त्यांच्यावरील हा खटला मागे घेण्यात आला. इंदिरा गांधींनी निवडणुकीची घोषणा करण्याबरोबरच आणीबाणी संपली. सन



संकलन व सुलेखन - श्री कृष्णकुमार आनंदी-गोविंदा निकोडे गुरूजी.एक प्राणीप्रेमी. रामनगर वॉर्ड, गडचिरोली. फक्त व्हॉट्सॲप- ९४२३७१४८८३.

१९७७मध्ये झालेल्या लोकसभा निवडणुकीत जॉर्ज यांनी मुझफ्फरपूर लोकसभा निवडणूक तुरुंगातून लढवली. त्यावेळी निवडणूकीत जॉर्ज यांचा साखळदंडातील फोटो प्रचारात वापरला गेला. तुरुंगातून त्यांनी निवडणूक लढली आणि विक्रमी मतांनी विजयी झाले. जनता पार्टीचे सरकार स्थापन झाले, मोरारजी देसाईंनी कामगारांच्या या नेत्याला उद्योग मंत्रीपद दिले. याच सरकारच्या काळात बडोदा डायनामाइट केस बंद करण्यात आली. जॉर्जने भाजपशी हातमिळवणी केली. हे त्यांच्या अनेक सहकाऱ्यांना आवडले नव्हते. संपूर्ण आयुष्यात जॉर्ज यांच्याकडे तीन मंत्रालय होते. त्यातील एक उद्योग, दुसरे रेल्वे आणि तिसरे मंत्रालय होते. संरक्षण मंत्री असताना पोखरण अणुचाचणी केली. मात्र त्याचे श्रेय अटलबिहारी वाजपेयींना मिळाले. जॉर्जच्या भाळी डाग लागला शवपेटी घोटाळ्याचा. तहलकाने हा घोटाळा उजेडात आणला होता. देशातील एकमेवर संरक्षण मंत्री ज्यांनी ६,६०० मीटर उंचीवरील सियाचीन ग्लेशियरचा १८वेळा दौरा केला होता. विमान प्रवासावेळी जॉर्ज यांची भेट लैला कबीर यांच्यासोबत झाली, लैला कबीर या माजी केंद्रीय मंत्री हुमांयू कबीर यांची कन्या होत्या. काही दिवस गाठीभेटी झाल्यानंतर, त्यांनी लग्न केले. त्यांचा मुलगा शॉन फर्नांडिस आता न्यूयॉर्कमध्ये बँकर आहे. जया जेटली या समता पक्षाच्या अध्यक्ष होत्या तर जॉर्ज फर्नांडिस केंद्रीय मंत्री. जया आणि जॉर्ज यांच्याबद्दल अनेक चर्चा मीडियामध्ये रंगत आल्या आहेत, मात्र त्यावर जया जेटली किंवा जॉर्ज यांनी कधीही भाष्य केले नाही. त्यांचे अनेक निकटवर्तीय देखील जॉर्ज आणि जया यांच्यातील नाते हे नेता आणि कार्यकर्ता असेच असल्याचे सांगतात. मात्र मीडियामध्ये चर्चा होती, की जया यांचा त्यांच्या आयुष्यातील प्रवेशानंतर लैला कबीर या जॉर्ज यांना सोडून गेल्याचे म्हटले जाते. जॉर्ज यांच्यावरील पुस्तकाचे लेखक जयदेव डोळे यांनी सांगितले की, जॉर्ज यांच्या मुलाच्या शिक्षणासाठी लैला कबीर या मुलासोबत राहात होत्या. मात्र सन २०१०मध्ये जेव्हा जॉर्ज आजारी पडले तेव्हा लैला कबीर परत आल्या होत्या.

जॉर्ज फर्नांडिस यांचा जन्म दि.३ जून १९३०ला जॉन जोसेफ फर्नांडिस आणि एलिस मार्था फर्नांडिस या धार्मिक वृत्तीच्या मध्यमवर्गीय मंगलोरी कॅथॉलिक ख्रिश्चन दांपत्याच्या पोटी झाला. त्यांचे वडील एका खाजगी विमा कंपनीत अधिकारी होते. सहा भावंडांमध्ये जॉर्ज सर्वात मोठे होते. त्यांचे शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर सोळाव्या वर्षी त्यांना रोमन कॅथॉलिक धर्मगुरू होण्याचे शिक्षण घेण्यासाठी पाठविण्यात आले. मात्र जॉर्ज यांनी ते पूर्ण करण्याऐवजी, वयाच्या १९व्या वर्षी मंगलोरमधील हॉटेल आणि वाहतूक व्यवसायातील कामगारांची संघटना बांधण्याचे काम केले. ही त्यांच्या सार्वजनिक जीवनाची सुरुवात होती. सन १९४९मध्ये जॉर्ज नोकरीच्या शोधात मुंबईत आले. तेथे त्यांचे सुरुवातीचे दिवस अत्यंत खडतर गेले. पुढे कामगार नेते डिमेलो आणि समाजवादी विचारवंत राम मनोहर लोहिया यांच्या संपर्कात ते आले, त्यांचा जॉर्ज यांच्या विचारांवर आणि जीवनावर मोठा प्रभाव पडला.

जॉर्ज फर्नांडिस सर्वप्रथम इ.स.१९६७मध्ये दक्षिण मुंबई लोकसभा मतदारसंघातून काँग्रेसचे पक्षाचे ज्येष्ठ नेते स.का.पाटिल यांचा पराभव करून लोकसभेत प्रवेश केला. मात्र इ.स.१९७१च्या लोकसभा निवडणुकीत त्यांना पराभव पत्करावा लागला. इंदिरा गांधी सरकारला त्यांनी कडाडून विरोध केला. स्वतंत्र भारताच्या इतिहासातील एकमेव रेल्वे कर्मचारी संपाचे त्यांनी इ.स.१९७४मध्ये नेतृत्व केले. आणीबाणीच्या कालावधीत एक आरोपी म्हणून त्यांनी तुरुंगवासही भोगला. इ.स.१९७७ साली मोरारजी देसाई यांच्या नेतृत्वाखाली सत्तेत आलेल्या जनता सरकारमध्ये त्यांनी उद्योगमंत्री म्हणून काम बघितले. जुलै १९७९मध्ये लोकसभेत काँग्रेस नेते यशवंतराव चव्हाण यांनी मांडलेल्या अविश्वास ठरावावर त्यांनी जनता सरकारच्या बाजूने प्रभावी भाषण केले, पण दुसऱ्या दिवशीच पंतप्रधान मोरारजी देसाईंच्या नेतृत्वावर आपला विश्वास राहिला नाही, असे जाहीर करून मंत्रीमंडळातून राजीनामा दिला. इ.स.१९८४च्या निवडणुकीत त्यांचा मंगलोर लोकसभा मतदारसंघातून पराभव झाला. पण इ.स.१९८९मध्ये ते बिहार राज्यातील मुझफ्फरपूर लोकसभा मतदारसंघातून जनता दलाच्या तिकिटावर लोकसभेवर निवडून गेले. विश्वनाथ प्रताप सिंह यांच्या नेतृत्वाखाली केंद्रात स्थापन झालेल्या संयुक्त आघाडी सरकारमध्ये ते रेल्वेमंत्री होते. इ.स.१९९१च्या लोकसभा निवडणुकांतही त्यांनी मुझफ्फरपूर लोकसभा मतदारसंघातून जनता दलाचे उमेदवार म्हणून विजय मिळवला. इ.स.१९९४मध्ये बिहार राज्याचे मुख्यमंत्री लालू प्रसाद यादव यांच्याशी झालेल्या मतभेदांमुळे त्यांनी आणि जनता दलाच्या नितीश कुमार आणि रवी रे यांच्यासारख्या नेत्यांनी समता पक्ष या स्वतंत्र पक्षाची स्थापना केली. इ.स.१९९६च्या लोकसभा निवडणुकीसाठी समता पक्षाने भारतीय जनता पक्षाबरोबर युती केली. फर्नांडिस यांनी बिहारमधील नालंदा मतदारसंघातून विजय मिळवला. पुढे इ.स.१९९८ आणि इ.स.१९९९च्या लोकसभा निवडणुकींत त्यांनी नालंदा मतदारसंघातूनच विजय मिळवला. इ.स.१९९९च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी समता पक्ष आणि रामकृष्ण हेगडे यांचा लोकशक्ती या पक्षांचे विलीनीकरण होऊन जनता दल- संयुक्त हा नवा पक्ष अस्तित्वात आला. इ.स.१९९८मध्ये अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या भाजप आघाडी सरकारमध्ये त्यांनी संरक्षण मंत्री म्हणून काम बघितले. इ.स.२००१मध्ये त्यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप झाले. त्यामुळे ते मार्च ते ऑक्टोबर २०२१पर्यंत मंत्रिमंडळाबाहेर होते. पण ऑक्टोबर २००१मध्ये त्यांची परत संरक्षण मंत्रीपदी नेमणूक झाली. इ.स.२००४च्या लोकसभा निवडणुकीत जॉर्ज फर्नांडिस यांनी बिहार राज्यातील त्यांच्या पूर्वीच्या मुझफ्फरपूर मतदारसंघातून विजय मिळवला. नंतरच्या काळात ते आजारपणामुळे लोकसभेत फारसे सक्रीय राहिले नाहीत.त्यांना इ.स.२००९च्या लोकसभा निवडणुकीत जनता दल-संयुक्त पक्षाने तिकीट नाकारले. त्यांनी अपक्ष म्हणून निवडणूक लढवली आणि त्यात त्यांचा पराभव झाला. त्यानंतर पक्षनेतृत्वाबरोबरचे त्यांचे मतभेद मिटले आणि ते राज्यसभेत पक्षातर्फे बिहारमधून निवडून गेले. अशा लोकप्रिय नेत्याचा मृत्यू दि.२९ जानेवारी २०१९ रोजी वयाच्या ८८व्या वर्षी झाला. इ.स.२०२०चा मरणोत्तर पद्मविभूषण पुरस्कार दिनांक ८ नोव्हेंबर २०२१ रोजी भारताचे राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते त्यांच्या कुटुंबियांना प्रदान करण्यात आला, हे विशेष!

!! पावन पुण्यस्मरणनिमित जॉर्ज फर्नांडिस यांना या लेखरुपाने विनम्र अभिवादन !!

कानाडोळा...

अनधिकृत होर्डिंग्ज
केवढा कानाडोळा
कायदा न् नियमांचा
करे पार चोळामोळा

अघटीत घडता
कुठे
धावाधाव पळापळा
अपघात
घातपातीत
जीव घालवी भोळा

मृत्यूलाही कंठ फुटे
रडू फुटले घळाघळा
दोष सांग कुणाचा रे
तोंडामधे कोंब बोळा

लाचारी का सत्ते पुढे
कापते ती चळाचळा
मिडीयाची चर्चा सत्रे
बोलतात टळा टळा

चिरीमिरी चोरी मारी
हसे मनी खळाखळा
सामान्याचे जीवन हे
झालापार खुळखुळा

हतबल गळाठलेली
सिस्टीम लोळागोळा
शहरे बनवली विद्रूप
कंटाळलो पोर खेळा

- हेमंत मुसरीफ पुणे .
९७३०३०६९९६.

सुसाट...

सुसाट निरव
रस्ते
वाहने ती भरधाव
अपघात घडताचं
सुरुहोई धावाधाव

उसळे किती गर्दी
अनियंत्रित जमाव
मारत सुटे चालका
प्रक्षोभक रे उठाव

प्रेक्षणीय स्थळ हे
पहाय लोटले गाव
उस्फुर्तमदतीसाठी
कुणाचे नसते नाव

घेतात फोटोसेल्फी
चाले कसा बनाव
बडवता चालकाला
उसळे उगा बेबनाव

हिटअन् रनची केस
ड्रायव्हर वरती घाव
मारत रहावे चकरा
कोर्टातलीधावाधाव

नेत्यांचाअसताकुणी
चाले आगळा बनाव
सुटून जाई नेता पुत्र
दुजांचे गोवता नाव

-- हेमंत मुसरीफ पुणे.
९७३०३०६९९६..

शेअर बाजारात गुंतवणूक करण्याच्या बहाण्याने नऊ लाखांची फसवणूक



वृत्तसंस्था ■ मुंबई

मुंबई : शेअर बाजारामध्ये गुंतवणूक करून मोठा नफा मिळवून देण्याचे आमिष दाखवून कुर्ल्यातील एका तरुणाला काही भामट्यानी नऊ लाख रुपयांना गंडा घातला. याप्रकरणी तरुणाने चुनाभट्टी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करत तपास सुरू केला आहे.

हैदर खान असे फसवणूक झालेल्या तरुणाचे नाव असून तो कुर्ला येथील कुरेशी नगर परिसरात वास्तव्यास आहे. गेल्या अनेक वर्षांपासून हैदर शेअर बाजारात गुंतवणूक करीत आहे. काही दिवसांपूर्वी त्याला समाजमाध्यमांवर शेअर बाजारसंबंधित एक जाहिरात दिसली. त्यावरील क्रमांकावर त्याने फोन केला असता, त्याला अधिक नफा मिळवण्याचे आमिष दाखवण्यात आले. यासाठी त्याला एका ?पच्या माध्यमातून काही पैसे गुंतवणूक करण्यास सांगितले.

सुरुवातीला त्याने कमी रक्कम जमा केली. त्याला ?पवर तत्काळ नफा दिसू लागला. त्यामुळे त्याने या ?पच्या माध्यमातून अधिक रक्कम गुंतवली. मात्र त्याला हे पैसे काढता येत नव्हते. त्यामुळे त्याने संबंधित क्रमांकावर संपर्क साधला असता, विविध कारणे सांगून त्याला आणखी पैसे भरण्यास भाग पाडण्यात आले. आशा प्रकारे या तरुणाने एकूण ९ लाख ३० हजार रुपये भरले. मात्र पैसे परत मिळत नसल्याने अखेर त्याने याबाबत चुनाभट्टी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

काळी पिवळी मीटर टॅक्सी व ऑटो रिक्षा भाडे दरात वाढ करण्यास मान्यता

वृत्तसंस्था ■ मुंबई

भाडेदर १ फेब्रुवारी २०२५ पासून लागू



मुंबई : मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरणाच्या दि. २६ सप्टेंबर २०२२ रोजीच्या बैठकीत काळी पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षा (सीएनजी) भाडेदर सुधारणा करण्यात आली होती. त्यानंतर वाहनाची सरासरी किंमत, ग्राहक निर्देशांक, वाहन कर्जाचा व्याजदर आदी मध्ये वाढ झाल्यामुळे प्राधिकरणाने काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षांचे भाडेदरवाढ करण्यास राज्य परिवहन प्रकरणाच्या २३ जानेवारी रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली आहे.

भाडेदर सुधारणा मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण क्षेत्रातील सर्व काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षा (सीएनजी) यांना लागू राहील. भाडेदर सुधारणा १ फेब्रुवारी २०२५ पासून लागू होईल.

जे टॅक्सी व ऑटोरिक्षा परवानाधारक सुधारीत भाडेदरानुसार भाडेमिटरचे रिकॅलीब्रेशन करून घेतील. त्या ऑटोरिक्षा, टॅक्सीना ही भाडेवाढ लागू होईल. भाडेमिटरचे रिकॅलीब्रेशन दिनांक १ फेब्रुवारी २०२५ पासून दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंत करून घेणे आवश्यक राहील. (भाडेमिटरचे रिकॅलीब्रेशन होईपर्यंत सुधारीत अधिकृत टॅरिफ कार्ड दिनांक ३० एप्रिल २०२५ पर्यंतच अनुज्ञेय राहील.) मोटार वाहन अधिनियमनुसार बृहन्मुंबई विदयुत पुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या (बेस्ट) १८५० बसेसचे ६ टप्पा प्रवासी वाहतूक परवान्याचे नुतनीकरण करण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे.

मुंबई महानगर क्षेत्र प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये प्रवाशांच्या सोयीसाठी व 'लास्ट माईल कनेक्टि?विटी' अनुषंगाने नवीन ०२ काळी-पिवळी मीटर टॅक्सी स्टॅण्ड, ६८ ऑटोरिक्षा स्टॅण्ड व ०९ शेअर-ए ऑटोरिक्षा स्टँड उभारण्यास प्राधिकरणाने मान्यता दिली आहे. काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षांचे भाडेदर सूत्र विहित करण्याबाबत शासनाने खटुआ समितीची स्थापना केली होती. समितीने सादर केलेल्या अहवालास शासनाने ०९ मार्च २०२० रोजीच्या निर्णयाव्दारे मान्य केले आहे. त्यानुसार काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) व ऑटोरिक्षा (सीएनजी) भाडे निश्चितीच्या सुत्रानुसार व वाहनाची सरासरी किंमत, ग्राहक निर्देशांक, वाहन कर्जाचा व्याजदर आदी बाबी विचारात घेऊन भाड्याची परिगणना केली जाते. मोटार वाहन कायदा, १९८८ कलम ६८ अन्वये, राज्य शासनाकडून मुंबई महानगर क्षेत्र परिवहन प्राधिकरण समिती गठित करण्यात आलेली आहे.

असे आहेत सुधारित दर :-

काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) साठी पूर्वीचे प्रति कि.मी. १८.६६ रुपये वरून २०.६६ रुपये भाडेदर सुधारणा करण्यात आली आहे. आता काळी-पिवळी मीटर टॅक्सी (सीएनजी) साठी किमान देय प्रति १.५ कि.मी. भाडे रूपये २८ रुपये वरून ३१ रुपये भाडेदर असणार आहे.

कुलकॅबसाठी पूर्वीचे प्रति कि.मी. भाडे रुपये २६.७१ वरून ३७.२ रुपये (२० टक्के वाढीप्रमाणे) भाडेदर सुधारणा करण्यात आली. आता कुल कॅबसाठी किमान देय प्रति १.५ कि.मी. भाडे रुपये ४० वरून ४८ रुपये (२० टक्के वाढीप्रमाणे) भाडेदर असणार आहे. ऑटोरिक्षा (सीएनजी) साठी पूर्वीचे प्रति कि.मी. भाडे रुपये १५.३३ रुपये वरून १७.१४ रुपये भाडेदर सुधारणा करण्यात आली आहे. आता ऑटोरिक्षा (सीएनजी) साठी किमान देय प्रति १.५ कि.मी भाडे रूपये २३ वरून २६ रुपये भाडेदर असणार आहे.

सोमनाथ सूर्यवंशी यांच्या मारेकऱ्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहिजे- रिपाई नेते विजय दादा साळवे

माजलगाव ■ दर्शन डोंगरे



माजलगाव :परभणी येथील सोमनाथ सूर्यवंशी या संविधान प्रेमी शहिदाच्या मारेकऱ्यास फाशीची शिक्षा झालीच पाहिजे अशी मागणी रिपाई नेते विजय दादा साळवे यांनी परभणी ते मुंबई येथे निघालेल्या लॉगमार्च मध्ये आमच्या प्रतिनिधीशी संवाद साधताना प्रतिक्रिया दिली. त्यांच्यासोबत कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते लॉग मार्चमध्ये ज्येष्ठ नेते कचरू तात्या खळगे, डॉ. खळगे,अंकुशराव जाधव,पत्रकार किशन भदर्गे, दीपकराव टाकणखार,दिलीपराव मक्सरे, राजकुमार सोनवणे, डी एस साळवे , वडवणीचे उजगरे,प्रकाश खळगे सर इत्यादी सहभागी झाले आहेत याबाबत अधिक माहिती अशी की सोमनाथ सूर्यवंशी हे कायद्याचा अभ्यास करणारे विद्यार्थी होते व ते ध.ँ. च्या परीक्षेची तयारी करीत होते अशा या कायद्याचा अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्याने कोणतीही दगडफेकी केली नव्हती किंवा कोणत्याही सीसीटीव्ही किंवा व्हिडिओ कॅमेरात ते दिसून आलेले नसतांनाही संविधानाच्या प्रतिमेची मोडतोड करून परभणीत दंगल कडून आणण्याचा प्रयत्न काही जातीवाद्यांनी केला होता व या परभणी शहरांमध्ये जे संविधानाच्या प्रतीकृतीची मोडतोड केली म्हणून परभणी जिल्हा बंद पुकारलेल्या संविधान प्रेमी नागरिकांनी कोणतेही असंवैधानिक काम केले नव्हते परंतु मोडतोड करून भारत देशाशी गद्दारी करणाऱ्यानी संविधानाची मोड तोड करून ज्या लोकांनी परभणी शहरांमध्ये व पर्यायाने महाराष्ट्रभर दंगली घडवून आणण्याचा कट काही जातीवाद्यांनी रचला होता व त्याचाच भाग म्हणून परभणी शहरांमध्ये लोकशाही मार्गाने परभणी जिल्हा बंद चे आव्हान करणाऱ्या आंबेडकर प्रेमी तरुणांवर कोणतेही असंवैधानिक काम न करता परभणी बंदचे आवाहन करीत होते परंतु भारतीय संविधानाच्या प्रतिकृतीची मोडतोड करण्यापूर्वी एक दिवस अगोदर एक मोर्चा परभणी शहरात निघाला होता व त्या मोर्चामध्ये संविधान विरोधी घोषणा सुद्धा देण्यात आल्या होत्या आणि दुसऱ्याच दिवशी संविधानाची प्रत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्या च्या हातात होती त्या संविधानाच्या पुस्तकाची मोडतोड करण्याचे काम एका माथेफिरूनी केले आणि त्या संविधानाची मोडतोड झाली म्हणून लोकशाही मार्गाने व शांततेने परभणी जिल्हा बंद चे आव्हान करणाऱ्या आंबेडकर प्रेमी तरुणांना सोडून काही जातीवादी गुंड पोलिसांची वर्दी घालून व काही गुंड प्रवृत्तीचे लोक मोडतोड दगडफेक करीत असल्याचे षडयंत्र रचून पळून गेले व जे लोकशाही मार्गाने आंबेडकर प्रेमी तरुण परभणी जिल्हा बंदचे आवाहन करीत होते त्यांना कोंबिंग ऑपरेशन करून व आंबेडकरी वस्त्यांमध्ये घुसून काही पोलिसांनी आंबेडकरी तरुणांचे कोंबिंग आपरेशन करून त्यांना बेदम मारहाण करत होते काही आंबेडकरी तरुणांना अशा ठिकाणी निरपराध बौद्ध तरुणांना गाठले की जिथून त्या तरुणांना पळून सुद्धा जाता येणार नाही जसे की जालियनवाला बाग हत्याकांड झाले होते त्याप्रमाणे त्या संविधान प्रेम आंबेडकरी तरुणांना गाठून बेदम मारहाण करीत होते पोलिसांची वर्दी घालून फिरणाऱ्या नकली गुंड पोलिसांनी केवळ निरपराध आंबेडकरी तरुणांचे कोंबिंग ऑपरेशनच केली नाही तर त्यांना बेदम मारहाण करीत आंबेडकरी वस्त्यांवर निर्मनुष्य जागेवर घराच्या बाहेर ज्या घरावर अशोक चक्र आहे व त्या घराच्या बाहेर उभ्या असलेल्या दुचाकी किंवा चार चाकी वाहनांना सुद्धा लाठ्या-काठ्यांनी मोडतोड करीत असल्याचे व्हिडिओ काही तरुणांनी आपल्या मोबाईल मध्ये शूटिंग केले होते अशाच तरुणांना गाठून त्यांचे कोंबिंग आपरेशन करीत त्यांना बेछुटपणे लाठीमार करीत जखमी करत होते आणि अशा निरपराध मुलांना अमानुषपणे मारहाण करीत असताना एका दवाखान्यामध्ये ड्युटी करणाऱ्या मानवते नावाच्या महिलेने तिच्या मोबाईल मध्ये ही शूटिंग घेण्याचा प्रयत्न केल्याचे बघून त्या बाईला केवळ मोबाईल मध्ये शूटिंग केली म्हणून तिला सुद्धा तिच्या केसाला धरून तिला घराबाहेर काढत तिच्यावर सुद्धा लाठी हल्ला केला व तिचा सुद्धा कोणतीही महिला कॉन्स्टेबल नसताना या गुंडांच्या वेशात आलेल्या पोलिसांनी त्या बौद्ध महिलेला फरपटत आणीत व मारहाण करीत लाठी चार्ज करीत पोलीस स्टेशनला म्हणते नेले व तिला आणि त्या निरपराध तरुणांना सुद्धा कोणाचे हात फॅक्चर होईपर्यंत कोणाचा पाय फ्रॅक्चर होईपर्यंत मारहाण केली त्या व्हिडिओ शूटिंग घेणाऱ्या महिलेला तर एवढे मारले की तिला लघवी ला आले असताना सुद्धा ती जेव्हा म्हणत होती की मला लघवीला जायचे आहे मला सोडा लघवीला जाऊ द्या तेव्हा तिला लघवीला तर बाथरूम कडे जाऊ दिले नाहीच उलट तिथे कोणतीही महिला पोलीस कॉन्स्टेबल नसताना त्या महिलेला इथेच लघवी कर असे म्हणत तिच्या गुप्तांगावर लाथा मारत अमानुषपणे तिचा छळ केला व असेच सर्व बौद्ध वस्त्यांतील तरुणांवर लाठीचार्ज करीत कोंबिंग ऑपरेशन करीत त्यांचा अमानुषपणे छळ केला हे अन्याय अत्याचार निरपराध तरुणांवर केले व जे दगडफेक करणारे प्रायोजित दंगल घडविणारे गुंड होते त्यांना मोकळे सोडून दिले एवढेच नव्हे तर एका व्हिडिओमध्ये त्याच गुंड पर्वती प्रवृत्तीचा एक साध्या वेषातला माणूस मारहाण करीत असल्याचे सुद्धा दिसून आलेले आहे असा अनंनवित अत्याचार छळ व अमानुषपणे मारहाण बौद्ध समाजातील आंबेडकरी तरुणांना व महिलांना सुद्धा केलेली आहे त्या अन्यायाच्या विरोधात संबंधितांना गुन्हेगारांना ?ट्रॉसिटी व कठोर शिक्षा करण्यात यावी आणि सोमनाथ सूर्यवंशी च्या मारेकऱ्यांना व त्याला जबाबदार असणाऱ्या जातीवादी पोलिसांवर खूनाचा गुन्हा दाखल करून त्यांना फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी या परभणी ते मुंबई चालणाऱ्या पायी लॉग मार्चमध्ये रिपाई नेते विजय दादा साळवे यांनी सरकारकडे मागणी केली परभणी ते मुंबई या लॉगमार्च मध्ये शेकडो बौद्ध आंबेडकर तरुण व महिला भगिनी सहभागी झालेले आहेत.

केज पंचायत समिती मैदानात ह. भ. प. केशव महाराज शास्त्री यांच्या अमृतवाणीतून भागवत कथेचा दुसरा दिवस ; भाविकांची कथा श्रवण करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती



केज ■ तात्या गवळी

केज पंचायत समिती मैदानात ह. भ. प. केशव महाराज शास्त्री यांच्या अमृतवाणीतून भागवत कथेस प्रारंभ होऊन आज दुसऱ्या दिवशी भाविकांनी कथा श्रवण करण्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थिती दर्शवली होती या कथेमध्ये हे.भ.प.केशव महाराज शास्त्री यांनी भाविकांना समजेल अशा भाषेत भागवत कथेचे कथन करून भाविकांना मंत्रमुग्ध केले होते यावेळी महाराजांनी भागवत कथा व्यास यांनी गणपती बाप्पाच्या हातून लिहून घेतले परंतु हे ज्ञान कोणाला द्यायचे हा मोठा प्रश्न व्यासा पुढे होता यावर मार्ग काढून भगवतगीतेचे कथा सांगत असताना महाराजांनी आवर्जून काही लोकांना आई-वडिलांपेक्षा कुत्रे पाळण्यात जास्त रस असतो यातून एकच संदेश देण्यात आला की, आपण आपल्या आई-वडिलांना व्यवस्थित सांभाळा व प्राणीमात्रावरही दया करा परंतु आधी माता पिता नंतर सर्व काही असा संदेश हहे.भ.प.केशव.भ.प. केशव महाराज शास्त्री यांनी आपल्या अमृतवाणीतून जनतेच्या मनावर रुजेल अशा भाषेत सांगण्याचा प्रयत्न केला यावेळी जमलेल्या भाविकांनी या कथेचे श्रवण करून आत्मसात करावे हीच अपेक्षा व्यक्त करण्यात आली.

यावेळी पंचायत समिती मैदानात मोठ्या संख्येने भागवत कथा श्रवण करण्यासाठी मोठ्या संख्येने महिला व लहान थोर मंडळी उपस्थित होती.

नॅक पुनर्मूल्यांकनात भगवान महाविद्यालयाला मिळाली B++ ग्रेड

बीड ■ गितांजली लव्हाळे

बीडः येथील शेतकरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या भगवान (कला, वाणिज्य व विज्ञान) महाविद्यालयास नुकतेच 'राष्ट्रीय मूल्यांकन व अधिस्वीकृती परिषद(ँ्ण), बेंगळुरू' या संस्थेचे ँ्ल(ण्उँ्ँ २.८२) असे मानांकन मिळाले आहे. १६ व १७ जानेवारी या कालावधीमध्ये
महाविद्यालयास भेट देऊन आपला अहवाल परिषदेस पाठवला होता. या पीअर टीमध्ये प्रोफेसर रमेश कुमार (प्र. कुलगुरू, बिहार विद्यापीठ, पाटणा) अध्यक्ष, प्रोफेसर ईश्वरचंद्र पंडित (बडोदा विद्यापीठ,गुजरात)समन्वयक, प्रोफेसर जतींदर बीर सिंह (प्राचार्य, कॉमर्स कॉलेज, दिल्ली) सदस्य यांचा समावेश होता.

या भेटीदरम्यान पीअर टीमने सर्व विभागांना भेटी देऊन संस्थेचे व्यवस्थापन मंडळ, विद्यमान व माजी विद्यार्थी तसेच पालक व महाविद्यालयाचा संपूर्ण स्टाफ यांच्याशी संवाद साधून महाविद्यालयाने प्राचार्य डॉ. दत्तात्रय वाघ व समन्वयक प्रा बाबासाहेब झिने यांचे नेतृत्वाखाली केलेल्या प्रगतीचा आढावा घेतला. या संदर्भात प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष महाविद्यालयास मदत करणाऱ्या व्यक्ती व संस्थांचे प्राचार्यांनी आभार व्यक्त केले.

या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष भीमराव धोंडे, सहसचिव डॉ. अजय धोंडे सर्व प्रशासकीय अधिकारी व समाजातील विविध घटकांनी प्राचार्य, समन्वयक आणि सर्व टीमचे अभिनंदन केले आहे.

मांजरा पुला वरच्या रस्ता दुरुस्तीसाठी संघर्ष समितीच्या वतीने रस्ता रोको आंदोलन;खा. बजरंग सोनवणे रस्त्यावर स्वतः केली वाहतूक सुरळीत



केज ■ तात्या गवळी

बीड व धाराशिव या दोन जिल्ह्याला जोडणारा मांजरा नदी पुला वरच्या रस्ता दुरुस्तीसाठी संघर्ष समितीच्या वतीने रस्ता रोको आंदोलन करण्यात आले. यावेळी बीड जिल्ह्याचे खा. बजरंग सोनवणे रस्त्यावर उतरले. तसेच रस्ता रोको संपल्या नंतर रस्त्या वरची वाहतूक सुरळीत करण्यासाठी खासदार स्वतः रस्त्यावर उतरून त्यांनी वाहतूक सुरळीत केली.

या बाबतची माहिती अशी की, दिनांक २८ जानेवारी २०२५ रोजी बीड व धाराशिव जिल्ह्यातील केज-कळंब दरम्यान असलेल्या मांजरा पुलावरील रस्ता दुरुस्त करण्या संदर्भात केज संघर्ष समितीचे प्रा. हनुमंत भोसले सर, संपत वाघमारे, तात्या गवळी, मुबशिर खतीब, नासीर मुंडे, गौतम बचुटे व कार्यकर्ते यांनी मांजरा नदीवरिल पुलाव रस्ता रोको आंदोलन केले. या वेळी एका कार्यक्रमासाठी जात असलेले खा. बजरंग सोनवणे हे जात असताना त्यांनी आंदोलन आणि अधिकारी यांची भेट घेऊन त्यांना रस्ता दुरुस्ती करण्या संदर्भात सूचना दिल्या. तसेच केज आणि कळंबच्या दोन्ही तहसीलदारांना त्यांनी या बाबत धारेवर धरले.

यावेळी आंदोलन संपल्या नंतर रस्त्यावर झालेली वाहतूक सुरळीत करण्या संदर्भात स्वतः बजरंग सोनवणे यांनी रस्त्यावर उतरून वाहतूक सुरळीत केली.

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महाराष्ट्र शासनाने एस.टी.बसचे केलेल्या भाडेवाढीच्या निषेधार्थ केज तहसील कार्यालया समोर निदर्शने

केज ■ तात्या गवळी



केज :शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने महाराष्ट्र शासनाने एस.टी.बस .चे केलेल्या भाडेवाढ निषेधार्थ केज तहसील कार्यालया समोर निदर्शने करण्यात आली.

शिवसेना पक्ष प्रमुख उद्धवजी ठाकरे व युवा सेना प्रमुख आदित्यजी ठाकरे यांच्या आदेशावरून शिवसेना नेते सुनील प्रभू,शिवसेना समन्वय विश्वनाथ नेरुळकर, शिवसेना उपनेत्या सुषमाताई अंधारे, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुराम जाधव,लोकसभा प्रमुख सुनील धांडे सर,बीड जिल्हा सहसंपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली व केज शिवसेना तालुकाप्रमुख अशोक जाधव यांच्या नेतृत्वाखाली केज तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.यावेळी जिल्हा सचिव रोहित कसबे, युवा सेना तालुकाप्रमुख किशोरजी घुले, शहर प्रमुख तात्या रोडे, शिवसेना उपतालुकाप्रमुख सुरज वाघमारे सुभाष ठोंबरे, संघटक सुधीर जाधव, तालुका सचिव सखाराम वायबसे, राजेभाउ मोठे, अंगद देशमुख, आप्पा कांबळे, मारुती गव्हाने पाटील, रामभाऊ पवार, नवनाथ वाघमारे, वैजनाथ वाघमारे, निलेश मुरकुटे,विश्वनाथ राऊत शिवसेना पदाधिकारी शिवसैनिक उपस्थित होते.

केज तालुक्यातील शासकीय कार्यालयात व शाळा, महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात संपन्न



केज ■ तात्या गवळी

केज तालुक्यातील शासकीय कार्यालयात व शाळा, महाविद्यालयात प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात संपन्न झाला आहे.

तहसील कार्यालय, नगरपंचायत कार्यालय, पंचायत समिती, उपविभागीय कार्यालय, पोलीस ठाणे केज, पोलीस ठाणे युसुफ वडगाव, उपजिल्हा रुग्णालय केज, सार्वजनिक बांधकाम उपविभागीय कार्यालय, लघुपाटबंधारे विभाग, दुय्यम निबंधक कार्यालय, तालुका कृषी कार्यालय, गटसाधन कार्यालय,जलसंधारण कार्यालय, भूमी अभिलेख कार्यालय, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत कार्यालय, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयासह सर्व शासकीय कार्यालयामध्ये प्रजासत्ताक दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला आहे.

महापुरुषांच्या विचाराने वाटचाल केली तर भारत देशाला जागतिक महासत्ताक व्हायला वेळ लागणार नाही - सौ. सुदामतीताई वाघ मॅडम

श्री महालक्ष्मी विद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिन उत्साहात साजरा



बीड ■ गितांजली लव्हाळे

बीड :-भारत देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या क्रांतिवीरांचे आणि देशभक्तांचे बलिदान हे आपल्याला प्रेरणा आणि स्फूर्ती देणारे आहेत. ही बाब लक्षात ठेवून आजच्या विद्यार्थ्यांनी आणि युवकांनी महापुरुषांचे विचार आत्मसात करून आपल्या जीवनाची वाटचाल केली तर भारत देशाला महासत्ता राष्ट्र व्हायला वेळ लागणार नाही असे मत शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ मॅडम यांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात भारतीय प्रजासत्ताक दिनी ध्वजारोहणानंतर अध्यक्षस्थानावरून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यक्त केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव श्री नामदेवराव वाघ साहेब, श्री गणेश कदम, श्री मसुराम कदम, श्री रणजीत कदम, श्री जगन्नाथ कदम, सरपंच श्री शिवलिंग तोडकर, श्री चंद्रशेन शेंडगे, श्री दिलीप कदम, श्री दत्तात्रय चव्हाण सर (मुख्याध्यापक), श्री आत्माराम वाव्हळ सर आदी उपस्थित होते.

बीड शहरापासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालय मध्ये भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त ध्वजारोहण

कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला राष्ट्रपिता महात्मा गांधी, छत्रपती शिवाजी महाराज आणि भारतीय घटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या अध्यक्षा सौ. सुदामतीताई वाघ मॅडम यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणा नंतर आलेल्या मान्यवरांचे शाळेतील विद्यार्थ्यांनी स्वागत गीत गाऊन तसेच शाल श्रीफळ आणि पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. मान्यवरांच्या स्वागता नंतर शाळेतील काही विद्यार्थिनींनी देशभक्तीपर गीतांचा गायन केले. इयत्ता आठवीतील विद्यार्थीनींनी कु. आरती आडे हिने भारतीय प्रजासत्ताक दिनावर आपले विचार व्यक्त केले. यानंतर काही निवडक मान्यवरांनी विचार मांडले. तर अध्यक्षीय समारोप करताना सौ. सुदामतीताई वाघ मॅडम म्हणाल्या की, २६ जानेवारी हा आपला प्रजासत्ताक दिवस आहे. २६ जानेवारी १९५० पासून भारतीय राज्यघटना अंमलात आली. त्यामुळे खऱ्या अर्थाने २६ जानेवारी दिन प्रत्येक भारतीयांचा स्वातंत्र्याचा दिन आहे. भारतीय प्रजासत्ताक दिन हा आपल्या सर्वांसाठी आनंदाचा उत्साहाचा आणि अभिमानाचा दिवस आहे. भारतीय संविधान सर्व जाती धर्माच्या नागरिकांना ऊर्जा देणारे आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधान लिहून प्रत्येक माणसाला स्वातंत्र्य मिळवून दिले आहे. देशाच्या नागरिकांना हे स्वातंत्र्य बहाल करण्यासाठी त्यांनी आपले जीवन समर्पित केले आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यासह भारत देशासाठी सर्वस्व अर्पण करणाऱ्या लाखो क्रांतिवीरांचे आणि देशभक्तांचे बलिदान हे आपल्याला प्रेरणा आणि स्फूर्ती देणारे आहेत. ही बाब लक्षात ठेवून आजच्या विद्यार्थ्यांनी आणि युवकांनी महापुरुषांचे विचार आत्मसात करून आपल्या जीवनाची वाटचाल केली तर भारत देशाला जागतिक महासत्ताक व्हायला वेळ लागणार नाही. त्यामुळे प्रत्येक नागरिकांनी आणि विद्यार्थ्यांनी आपले जीवन उज्वल करण्यासाठी महापुरुषांच्या विचार आत्मसात करावे असे आवाहन यावेळी सौ. सुदामती ताई वाघ मॅडम यांनी केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री श्री आत्माराम वाव्हळ सर यांनी केले तर आभार श्री दत्तात्रय चव्हाण सर यांनी मानले. सदर कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम यांच्यासह विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. यावेळी भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध स्पर्धेतील विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

जनविकास परिवर्तन विकास आघाडीच्या आयोजित हाळदी कुंकू कार्यक्रमास महिलांचा उदंड प्रतिसाद

केज ■ तात्या गवळी



केज; जनविकास परिवर्तन आघाडीच्या वतीने हळदी कुंकू महोत्सवास शनिवारपासून प्रारंभ करण्यात आला आहे, या महोत्सवाला शहरातील महिलांनी उदंड प्रतिसाद दिला आहे.

याही पुढे जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारूणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी महिलांसाठी विविध उपक्रम घ्यावेत अशा प्रतिक्रिया कार्यक्रमातून महिला वर्गातून उपस्थित केल्या जात आहेत.

हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांचे कौतुक देखील महिला करत आहेत.

बुधवारी जय भवानी विद्यालय कानडी रोड येथे कार्यक्रमाचा समारोप करण्यात येणार आहे तरी शहरातील महिलांनी या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड व जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांनी केले होते. या आवाहनाला माझ्याकडून उदंड प्रतिसाद मिळत आहे.

गेले पाच ते सहा वर्षापासून जनविकास परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून व हारुणभाई इनामदार यांच्या संकल्पनेतून केज शहरांमध्ये नारी महोत्सव आयोजित करण्यात येत आहे. यामध्ये महिलांसाठी हळदीकुंकवाचा कार्यक्रम, उखाण्याचा कार्यक्रम, महिलांना जनविकास परिवर्तन आघाडीच्या माध्यमातून एक वस्तू चांगले भेट म्हणून देण्यात येत आहे त्याचबरोबर अल्पोपहाराची व्यवस्था देखील करण्यात येते.

हळदी कुंकू महोत्सवाच्या माध्यमातून महिला एकत्र येत विचाराची देवाणघेवाण करून एकमेकाशी हितगुज साधत असल्यामुळे या कार्यक्रमावर महिला खुश असल्याच्या प्रतिक्रिया देत आहेत

महिला घर काम, व्यवसाय, नोकरी सह इतर कामा त वर्षेभर व्यस्त असतात त्यामुळे महिलांना एकमेकीशी संवाद साधता येत नाही.

या जनविकास परिवर्तन आघाडीच्या हार्दिक महोत्सवाच्या माध्यमातून त्यांना हितगुज साधून एकमेकींच्या विचाराची देवाणघेवाण करण्याची संधी उपलब्ध होते त्यामुळे महिलावर्ग खुश असल्याच्या भावना त्यांच्यातून पाहावयास मिळत आहेत.

हळदी कुंकू नारी महोत्सव हा जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांच्या संकल्पनेतून व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांच्या नेतृत्वाखाली संपन्न होत आहे स्वतः नगराध्यक्षा कार्यक्रमांमध्ये सहभागी होऊन महिलाशी संवाद साधून त्यांच्या अडीअडचणी जाणून घेत आहेत. या कार्यक्रमाच्या माध्यमातून महिला हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांचे कौतुक करत आहेत.

सुभाषनगर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचा ना. महेश शिंदे यांनी केला गौरव; संगणक लॅबचे केले उद्घाटन

कोरेगाव ■ प्रतिनिधी



कोरेगाव शहरात असलेल्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुभाषनगर येथे मूलभूत संगणक व कोडींग प्रशिक्षण घेण्यात आले होते. हे प्रशिक्षण सौ. सारिका संतोष टंकसाळे यांनी १४०० प्रशिक्षणार्थीमधून उत्कृष्टरित्या विशेष प्राविण्य मिळवून पूर्ण केले आणि टॉप ४२ मध्ये मॉडेल शिक्षक म्हणून स्थान पटकावले त्यांच्या या उज्जवल कार्याबद्दल त्यांच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सुभाषनगर या शाळेस पाच संगणक असणारी संगणक लॅब बक्षीस म्हणून प्राप्त झाली असून या लॅबचे उद्घाटन कृष्णा खोरे विकास महामंडळाचे उपाध्यक्ष ना. महेश शिंदे यांच्या हस्ते प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून करण्यात आले. यावेळी त्यांनी शाळा परिसराची पाहणी करून शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले. गोरगरिब आणि सर्वसामान्य कुटुंबातील विद्यार्थी या शाळेत शिक्षण घेत असून त्यांना चांगले शिक्षण दिले जात असल्याबद्दल त्यांनी शिक्षण विभागाच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकली.

कोरेगाव येथील मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीतील शासकीय ध्वजारोहण सोहळ्यानंतर ना. महेश शिंदे यांनी जिल्हा नियोजन समितीचे सदस्य राहुल प्रकाश बर्गे, माजी उपनगराध्यक्ष सुनीलदादा बर्गे, नगरसेवक सागर बर्गे, पंचायत समितीच्या प्रशासक तथा गटविकास अधिकारी सुप्रिया चव्हाण, लालासाहेब गावडे गटशिक्षणाधिकारी धनंजय चोपडे यांच्यासमावेत सुभाषनगर जिल्हा परिषद प्राथमिक शाळेस भेट दिली. मुख्याध्यापिका मंगल शिंदे यांच्यासह विजय भुजबळ सर महिला शिक्षिका पवार, घोरपडे, बागाव, टंकसाळे कुंभार, भागडे यांच्यासह शिक्षक भुजबळ यांनी ना. महेश शिंदे यांचे स्वागत केले. शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष बाबासाहेब गांधले, उपाध्यक्ष शिर्के, सुरज शिर्के यांनी शाळेच्या कामकाजाचा आढावा घेतला. या शाळेने अत्यंत नेत्रदीपक प्रगती केली आहे. पाय जाम फाउंडेशनच्या माध्यमातून कोडींग प्रशिक्षण पूर्ण केल्याबद्दल या शाळेच्या शिक्षकांना संगणक लॅब बक्षीस म्हणून मिळाली असून या लॅबचे उद्घाटन ना. शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले. या संगणक लॅब मध्ये विद्यार्थ्यांना बसण्यासाठी खुर्च्या नसल्याचे पाहून ना. महेश शिंदे यांनी तात्काळ दहा खुर्च्या या शाळेस भेट दिल्या. त्यांच्या या समसूचकतेमुळे विद्यार्थ्यांना संगणक शिक्षण घेणे सोपे जाणार आहे. त्याचबरोबर या शाळेने जिल्हास्तरीय क्रीडा स्पर्धा, साक्षरता अभियान, पथनाट्य हेक्यथॉन स्पर्धेत यश मिळवले असून तालुकास्तरावरील साक्षरता मेळाव्यातील साक्षरता गीत देखील उत्कृष्ट ठरले आहे याबद्दल ना. महेश शिंदे १यांनी शाळेचे कौतुक केले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिक्षिका सौ सारिका टंगसाळे यांनी केले.

एम.ई.पी.एल कंपनीविरोधात स्थानिक नागरिक पुन्हा आक्रमक

रांजणगाव गणपती प्रतिनिधी ■ बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपती : पुणे जिल्ह्यातील रांजणगाव एमआयडीसी ला पंचतारांकित औद्योगिक नगरी संबोधले जात असले, तरी येथील भूमिपुत्र व प्रदूषण बाधित शेतकरी आजही मरण यातना भोगत असल्याचे उपस्थित बाधित शेतकऱ्यांनी सांगितले.

एम.ई.पी.एल कंपनी मुळे सार्वजनिक आरोग्य धोक्यात आले असून परिसरात विविध रोगांचा प्रादुर्भाव वाढलेला आहे, या भागातील नागरीकांमध्ये त्वचा रोग, श्वसनाचे विकार, कॅन्सर सारख्या रुग्णाची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे दूषित व फेसाळ पाण्यामुळे शेती नापीक होऊन पिण्याच्या पाण्याचे स्त्रोत केमिकल युक्त झाल्याने कित्येक जनावरे दगावली असल्याचे उपस्थित आंदोलकांनी सांगितले. या घातक कचरा प्रक्रिया प्रकल्पाविरोधात स्थानिकांची यापूर्वी अनेक आंदोलने केली व सुरू आहे तरीही प्रशासन सदरच्या गंभीर गोष्टीकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करते आहे का?असा सवाल स्थानिक आंदोलकांनी केला. व 'एम.ई.पी.एल हटाव गाव बचाव' अशा घोषणा हि यावेळी देण्यात आल्या.

महाराष्ट्र एन्व्हायरो पावर लिमिटेड कंपनी बंद करण्यात यावी असे लेखी निवेदन मंगळवारी रांजणगाव एम.आय.डी.सी चे उपअभियंता श्री. कासार साहेब यांना दिले आहे. यावेळी, निमगाव भोगी, अण्णापूर, सरदवाडी, येथील आजी माजी सरपंच, ग्रामपंचायत सदस्य, कुमार महाराज नानेकर मित्र परिवार तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

केज येथील कलावंतांच्या वतीने देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम संपन्न



केज ■ तात्या गवळी

केज येथे तहसील कार्यालयाच्या समोर रोटरी क्लब ऑफ केज व पुरोगामी पत्रकार संघ संलग्न कला क्रीडा विश्व समिती केज च्या वतीने आज केज येथील कलावंतांनी देशभक्तीपर गीतांचा कार्यक्रम सादर केला या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक हनुमंत भोसले सर यांनी केले तर कार्यक्रमास जनविकास परिवर्तन आघाडीचे सर्वेसर्वा हारुणभाई इनामदार व केज नगरपंचायतच्या नगराध्यक्षा सौ.सीताताई बनसोड यांनी कलावंतांचा सत्कार करून पुढील कार्यास कलावंतांना शुभेच्छा दिल्या तसेच या कार्यक्रमास रोटरी क्लबचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते त्याचबरोबर कला क्रीडा विश्व समितीचे सर्व पदाधिकारी देखील उपस्थित होते या कार्यक्रमास सर्व शासकीय अधिकारी तसेच पोलीस कर्मचारी शिक्षक वृंद विद्यार्थी उपस्थित होते यावेळी मंचावरील कलावंतांनी देशभक्तीपर गीत गाऊन प्रेक्षकांची मने जिंकली या कार्यक्रमास केज व केज तालुक्यातील ग्रामीण भागातील सर्व कलावंत उपस्थित होते या कार्यक्रमात अनिल वैरागे, दीक्षा कांबळे, मुनीर कुरेशी, शिवमूर्ती हजारे, अमोल सरवदे, चुन्नू मिया शेख, मुन्ना भाई खतीब, यांनी उत्कृष्ट गीत गायले रोटरी क्लबच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी कलावंतांचे स्वागत करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.

पोलीस निरीक्षक पोहोचले पारधी वस्तीच्या शाळेवर विद्यार्थी आणि पालकांशी गप्पा मारीत साधले हितगुज



केज ■ तात्या गवळी

केज पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक वैभव पाटील हे प्रजासत्ताक दिनाच्या एक दिवस अगोदर एका पारधी वस्तीच्या वस्ती शाळेवर पोहोचले त्यांनीं शाळेचे विद्यार्थी आणि त्यांच्या पालकांशी हितगुज साधत गप्पा मारल्या.

संतोष देशमुख यांचे अपहरण आणि हत्या प्रकरणा पासून केज पोलीस आणि जिल्ह्यातील सर्व पोलीस यंत्रणा यांच्या विषयी सामान्य नागरिकांत संशयाचे वातावरण आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणा नंतर केज पोलीस ठाण्याचे प्रभारी पोलीस निरीक्षक यांची बदली झाली असून त्यांच्या जागी पोलीस निरीक्षक वैभव पाटील हे रुजू झाले आहेत.

दरम्यान दि. २५ जानेवारी रोजी पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी भारतीय प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधून केज तालुक्यातील कोरेगाव येथील पारधी वस्तीच्या एका वस्ती शाळेला भेट दिली. पारधी वस्ती शाळेतील विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप केले. शाळेतील विद्यार्थ्यांशी आणि पालकांशी अनौपचारिक गप्पा मारीत त्यांच्याशी हितगुज साधले. पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांच्या या वेगळ्या उपक्रमाची सर्वत्र चर्चा होत असून त्यांचे कौतुक होत आहे.

प्रजासत्ताक दिनानिमित्त स्वाभिमानी पत्रकार संघाच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय केज येथे रुग्णांना फळाचे वाटप



केज ■ तात्या गवळी

केज : प्रजासत्ताक दिनानिमित्त स्वाभिमानी पत्रकार संघाच्या वतीने उपजिल्हा रुग्णालय केज येथे रुग्णांना फळाचे वाटप करण्यात आले आहे.

याबाबतची सविस्तर माहिती अशी की, प्रजासत्ताक दिनाचे औचित्य साधत स्वाभिमानी पत्रकार संघाच्या पत्रकार बांधवांच्या हातून रुग्णाची सेवा घडावी या संकल्पनेतून केज येथील उपजिल्हा रुग्णालयातील रुग्णांना स्वाभिमानी पत्रकार संघाच्या वतीने फळाचे वाटप करण्यात आले.

यावेळी भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर यांनी मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, पत्रकार बांधव हे पत्रकारितेच्या माध्यमातून गोरगरिबांना न्याय मिळवून देतातच त्याचबरोबर गरजू रुग्णांना फळ वाटपाच्या कार्यक्रमातून देखील एक सामाजिक बांधिलकी जपत पत्रकार बांधव हे सहकार्य करत आहेत त्याबद्दल त्यांनी पत्रकार बांधवांचे कौतुक केले व प्रजासत्ताक दिनानिमित्त राज्यातील सर्व नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी भीमशक्ती सामाजिक संघटनेचे मराठवाडा संघटक चंद्रकांत खरात सर, उपजिल्हा रुग्णालयाचे डॉ?.महेश कांबळे, परिचर संतोष शेळके, परिचारिका सोपनाजा सोनवणे मॅडम, बीड न्यूज चैनलचे संपादक मुबाशीर खतीब, दैनिक लोकनायकचे केजतालुका प्रतिनिधी महादेव काळे, स्वाभिमानी पत्रकार संघाचे अध्यक्ष तात्या गवळी, उपाध्यक्ष संजय खळगे, सचिव वसंत सोनवणे, सहसचिव विकास सोनवणे, कोषाध्यक्ष विवेक बनसोड, प्रसिद्धीप्रमुख विनोद पवार, कायदेविषयक सल्लागार ?ड.सतीश मस्के, ज्येष्ठ पत्रकार तथा मार्गदर्शक अशोक नागरगोजे, बाळासाहेब गलांडे, संघरत्न शिंदे, सुहास पवार, बापूराव कराड, मेजर के.एस.घुल, एस.एन.घुले, आत्मलिंग खरबड, सिद्धार्थ मुंडे यांच्यासह पत्रकार बांधव व उपजिल्हा रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका, परिचारक आणि कर्मचारी उपस्थित होते.

३१ जानेवारी पर्यंत विद्यावेतन देण्यात यावे नसता तीव्र आंदोलन मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांचे उपविभागीय अधिकारी यांना पत्र; युवा प्रशिक्षणार्थ्यांचे विद्यावेतन देण्यास कौशल्य विभागाकडून टाळाटाळ

माजलगाव ■ **दर्शन डोंगरे**



माजलगाव : मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेत प्रशिक्षणार्थी सहा महिन्याकरिता प्रशिक्षण घेत आहेत. बहुतांशी जिल्ह्यातील प्रत्येक प्रशिक्षणार्थी हा प्रशिक्षक (ट्रेनी टीचर) म्हणून तन मनाने विद्यादानाचे काम करत आहे. आज या कार्य प्रशिक्षण प्रणालीला पाचवा महिना लागला आहे. आपला कार्यकाळ सहा महिन्याचा असल्याने ते प्रशिक्षणार्थी हवालदिलं झाले आहेत. प्रशिक्षणार्थ्यांनी पाच महिन्याच्या प्रशिक्षण काळात जे विद्यादानाचे काम केले आहे त्याचा मोबदला पण त्यांना आजतागायत देण्यात आला नाही तालुकास्तरावरील संबंधित अधिकाऱ्याची मानधनाबाबत विचारणा केली असता त्यांच्याकडून जिल्हा कौशल्य विभागातील कर्मचाऱ्याकडून आपल्या ऑनलाईन मध्ये डिफॉल्ट असल्याचे सांगण्यात येत आहे .प्रत्येक वेळी आपली ऑनलाइन प्रणाली चुकीची असल्याचे निदर्शनास आणून देण्यात येत आहे. असे बोलले जात आहे कित्येकदा जिल्हा कौशल्य विभागाकडून ऑनलाईन झालेले फाईल त्या डिलीट करण्यात येत आहेत. त्यामुळे मुख्यमंत्री युवा प्रशिक्षक (ट्रेनी टीचर) यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तरी संबंधित विभागास योग्य त्या सूचना करून मुख्यमंत्री युवा प्रशिक्षणार्थी यांचे विद्यावेतन देऊन तात्काळ निर्णय घ्यावा नसता दिनांक ३१ जानेवारी रोजी संबंधित कार्यालयासमोर आंदोलन करण्यात येईल असा इशारा मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षणार्थी यांच्या मार्फत देण्यात आला या निवेदनावर शरद पवार, दिगंबर बादाडे, अविनाश क्षिरसागर, छाया शिंगाडे, पूजा शिंदे, अश्विनी फुंदे , विशाखा वक्ते , सम्रता पोटभरे , परमेश्वर नरसाळे, अमोल चव्हाण , श्रुती कदम, गोविंद आव्हाड, विजय पवार, अजय डाके, शेख आयशा, लक्ष्मण पवार , अंगद गरड, महादेव गरड, साळवे सुकेशनी आदीसह प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

समाजाला संत गाडगेबाबा यांच्या विचारांची गरज - डॉ कैलास वायभासे

आष्टी ■ आदिनाथ ठोंबरे



आष्टी : आजचे युग हे विज्ञान व तंत्रज्ञानाचे आहे. विद्यार्थ्यांनी मोबाईलच्या पाठीमागे न लागता अभ्यास करावा. मोबाईल हे जेवढे फायद्याचे आहेत तेवढे त्याच्यापासून तोटे ही आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मोबाईलचा योग्य वापर करावा. विद्यार्थी हा देशाचा भावी आधारस्तंभ आहे त्यामुळे विद्यार्थ्यांनी आज नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करून उच्च अधिकारी बनावे व आपल्या आई-वडिलांचे नाव उज्वल करावे. आजच्या समाजाला समाज सुधारक संत गाडगेबाबा यांच्या विचारांची गरज आहे असे प्रतिपादन सोमवारी (ता २७) अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. कैलास वायभासे यांनी केले. ते डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजी नगर व कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धानोरा यांचे संयुक्त विद्यमाने चिंचोली (ता आष्टी) येथे आयोजित राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते.

या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून भास्कर धलावडे, बबन दहातोंडे, किशोर अंधारे, शरद जाधव, शेख मुनीर फौजी, सुधीर ठाणगे, दिनेश जाधव, श्रीमती थोरवे, हौसराव भालेराव, हरिश्चंद्र गाडे, माजी सरपंच महादेव इथापे आदी उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांना व शिक्षकांना मतदार दिनानिमित्त शपथ देण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ उस्मान खान पठाण यांनी केले. या कार्यक्रमाला प्रा.निसार शेख, डॉ. रमेश खिळदकर, प्रा विवेक महाजन, प्रा आजिनाथ गिलचे, प्रा राजेंद्र मिसाळ, प्रा आतेश बनसोडे, प्रा ज्ञानेश्वर अम्रीत, प्रा डॉ बोराडे बाळू, प्रा राजू शेलार, प्रा शबाना शेख, प्रा रत्नमाला तरटे, प्रा सुभाष मोरे, प्रा ज्ञानदेव बोडखे, प्रा गोरक्षनाथ वाळके, प्रा सतीश तागड यांच्यासह नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रमाधिकारी डॉ संजय झांजे यांनी तर आभार प्रदर्शन प्रा गहिनीनाथ एकशिंगे यांनी मानले. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने विद्यार्थी शिक्षक व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पात्र मतदारांनी मतदार यादीत आपले नाव नोंदवून लोकशाही बळकट करावी : प्राचार्य मारुती कदम

रांजणगाव गणपती प्रतिनिधी ■ बाळासाहेब कुंभार



रांजणगाव गणपती : भांबर्डे (ता. शिरूर) येथील न्यू इंग्लिश स्कुल विद्यालयात १५वा राष्ट्रीय मतदार दिवस मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. प्राचार्य मारुती कदम यांनी नवमतदारांनी १८वर्ष पूर्ण झाल्यानंतर मतदार यादीत नाव नोंदविणे गरजेचे असल्याचे सांगितले. विद्यार्थी आणि शिक्षकांना मतदानची शपथ देऊन मतदार जागृती केल्याशिवाय लोकशाही मजबूत होणार नाही असे विद्यालयाचे प्राचार्य मारुती कदम यांनी सांगितले.

या २५ जानेवारीला, मतदार दिवसाला ७५ वर्ष पूर्ण झाले आहे. त्यामुळे सध्याच्या मतदार दिवसाची थीम आहे, ' समान मतदान हक्क, प्रत्येकाच्या अधिकाराची सुरक्षितता. ' या कार्यक्रमासाठी प्राचार्य राजाराम ढवळे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी प्राचार्य ढवळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'मतदारांनी बुलेट ऐवजी बॅलेटचा वापर करावा. जास्तीत जास्त मतदारांनी नोंदणी करून मतदानाचा हक्क बजवावा म्हणजे लोकशाही बळकट होईल.'' नुकत्याच झालेल्या विधानसभेच्या निवडणुकीत ६८.९२ टक्के मतदारांनी शिरूर विधानसभेच्यावेळी आपला मतदानाचा हक्क बजावला आहे. या मतदान दिनाअखेर २लाख ४४हजार ३७८ पुरुष मतदार, २लाख २६हजार ४३५ महिला मतदार तर २४इतर असे एकूण ४लाख ७०हजार ८३७ मतदारांची शिरूर विधानसभा मतदार संघात , नोंदणी झालेली आहे. शाळा, महाविद्यालयातून मतदार जनजागृती झाल्याने मतदार नोंदणी दिवसेंदिवस वाढत आहे. तसेच पुढील काळात येणाऱ्या निवडणुकीसाठी जास्तीत जास्त नवमतदारांनी नोंदणी करावी.'

बाळासाहेब म्हस्के तहसीलदार शिरूर यावेळी सविता शिंदे, नानाभाऊ थोरात, विठ्ठल जगदाळे, इ. मान्यवर उपस्थित होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक सुरेश शेळके यांनी केले. सुत्रसंचालन उत्तम गाडे यांनी केले. तर आभार बाळासाहेब दिवेकर यांनी मानले.

शिरढोणच्या दलित कुटुंबावर अन्याय करणाऱ्या महसूल अधिकारी व कर्मचाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याच्या मागणीसाठी कोरेगावात आमरण उपोषण

कोरेगाव ■ **अज्जू मुल्ला**



कोरेगाव : कोरेगाव तालुक्यात शिरढोण येथे एकच दस्त दोन वेळा नोंदणी करण्याचा प्रकार घडलेला आहे. एकूणच खंडाईत नामक दलित कुटुंबावर अन्याय झाला असून या प्रकरणी दोषी असलेल्या शासकीय अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करून त्यांची चौकशी करावी आणि फौजदारी गुन्हे दाखल करावेत या मागणीसाठी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष रमेश उबाळे यांच्या नेतृत्वाखाली अन्यग्रस्त दलित समाजातील खंडाईत कुटुंबियांनी प्रजासत्ताक दिनी रविवारी सकाळी नऊ वाजल्यापासून कोरेगावच्या मध्यवर्ती प्रशासकीय इमारतीसमोर आमरण उपोषण सुरू केले आहे.

शिरढोण येथील खंडाईत कुटुंबातील सदस्यांच्या जमिनीबाबत १९८५ पासून दिवाणी न्यायालयात वाद सुरू आहे, तो सध्या प्रलंबित आहे. न्यायप्रविष्ठ बाब असलेल्या या जमिनीच्या बेकायदेशीर दस्ताची खरेदी विक्री करून महसूल विभागातील अधिकाऱ्यांनी मलिदा लाटलेला आहे. या प्रकरणाची चौकशी करून संबंधित दस्त नोंदणी अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करावे, बेकायदेशीर दस्त करणाऱ्या व्यक्ती व अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हा दाखल करावा, अशी मागणी रमेश उबाळे यांनी केली आहे.

महसूल अधिकाऱ्यांनी हात मिळवणी करत सामान्य दलित असलेल्या खंडाईत कुटुंबाची फसवणूक केली असल्याचे उघडकीस आलेले आहे. दलित कुटुंबाने वारंवार भेटून अर्ज देऊन देखील ,सातबारा वर त्यांची नाव चढवली. सातबारा उताऱ्यावर एकूण अशी नोंद असताना त्यावर काट मारण्यात आले आहे त्याचबरोबर त्या कुटुंबांना विचारात न घेता आर्थिक देवाण-घेवाण झाली आहे. गिरी गोसावी आणि केंजळे या दोन्ही कुटुंबांनी खंडाईत कुटुंबावर आत्महत्या करण्याची वेळ आणलेली आहे. शिरढोण सजातील तलाठी, कोरेगावचे मंडल अधिकारी , दुय्यम निबंधक, तहसीलदार यांची सखोल चौकशी करून त्यांना तात्काळ निलंबित करावे, अशी मागणी उबाळे यांनी केली आहे.

'तायवाडे कॉलेज महादुला- कोराडी चे सात दिवसीय श्रमसंस्कार शिबिराचे घोगली या गावात उद्घाटन संपन्न'

कोराडी ■ दिलीप येवले



कोराडी :सच्चिदानंद शिक्षण संस्था नागपूर द्वारा संचालित तायवाडे कॉलेज महादुला- कोराडी येथील 'युथ फॉर माय भारत आणि डिजिटल साक्षरता' या संकल्पनेवर आधारित ' राष्ट्रीय सेवा योजना विशेष श्रम संस्कार शिबिर दि.२५/०१/२०२५ ते ३१/०१/२०२५ पर्यंत सुख सागर, दुर्गा माता मंदिर, घोगली येथे आयोजित करण्यात आले.

या शिबिराचे' उद्घाटन दिनांक २७ जानेवारी २०२५ रोजी सुख सागर, दुर्गा माता मंदिर, घोगली येथे करण्यात आले. या कार्यक्रमाला उद्घाटक म्हणून अँडव्होकेट श्रवणकुमार मदनानी, अध्यक्षपदी सच्चिदानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, प्रमुख अतिथी श्रीमती मदनानी व ग्रामपंचायत घोगली चे सरपंच राहुल सोनारे आणि उपसरपंच ओमप्रकाश भांगे, श्रीमती शिला बोलधने, श्रीमती वर्षा घोडमारे, श्रीमती अपर्णा गाडेकर, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. शरयू तायवाडे मंचावर उपस्थित होते.

आपल्या उद्घाटकीय भाषणातून अँडव्होकेट श्रवणकुमार मदनानी यांनी माणुसकीची जाणीव ठेवून माणसाने माणसाच्या कामी कसे येता येईल. तसेच आपल्या राष्ट्राला आपल्या माध्यमातून कशी सेवा करता येईल असे मत आपल्या मार्गदर्शनातून मांडले. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी लाभलेले सच्चिदानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष बबनराव तायवाडे, यांनी इतर विद्यार्थी ज्या शिखरावर पोहोचलेले आहे ते आपणही करू शकतो. ते करू शकलो नाही तर आपण कुठे मागे राहत आहे. याचे आत्मचिंतन करून आपण इतरांपेक्षा कसं वेगळं करता येईल यासाठी प्रयत्न केले पाहिजे. तरच या शिबिराचे सार्थक होईल असे आपल्या अध्यक्षिय भाषणातून सर्व शिबिरार्थींना सांगितले.

प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित घोगली ग्रामपंचायत चे सरपंच राहुल सोनारे यांनी मी सुध्दा या महाविद्यालयाचा माजी विद्यार्थी आहे, आणि महत्वाचे म्हणजे मीसुध्दा एन.एस.एस.शिबिरात भंसाळी टाकळी येथे स्वयंसेवक म्हणुन कार्य केले. मी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरातून प्रेरित झालो. त्यामुळेच समाजसेवेची भावना माझ्यात निर्माण झाली. असे आपल्या संभाषणातुन आपले मत माडंले उपसरपंच ओमप्रकाश भांगे

यांनीसुध्दा आपल्या चर्चेतून मुलांना प्रेरित केले.

शिबिराचे प्रास्ताविक तायवाडे महाविद्यालयाच्या प्राचार्य मा. डॉ.शरयू तायवाडे यांनी केले. त्यांनी आपल्या प्रास्ताविकातून सांगितले की १४ वर्षापासून सतत आदासा येथे राष्ट्रीय सेवा योजना शिबिराचे आयोजन केले असून यावर्षी प्रथमच सुखसागर दुर्गा माता मंदिर घोगली या गावात हे शिबिर होत आहे असे सांगितले. तसेच या शिबिरात होणाऱ्या कार्यक्रमांची रुपरेषा समजावून दिली.

या उद्घाटनिय कार्यक्रमाचे संचालन डॉ.वर्षा वैद्य यांनी केले. तर आभार प्रदर्शन रा. से. यो. समन्वयक डॉ. वकील शेख यांनी मानले.'भारतीय युवक आणि डिजिटल साक्षरता' या संकल्पनेवर आधारित राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे मुख्य उद्दिष्ट युवकांमध्ये शिस्त आणि राष्ट्राविषयी आपले प्रेम कशाप्रकारे व कोणकोणत्या माध्यमातून व्यक्त करू शकतो हे आहे. या कार्यक्रमाला रा.से. यो. चे सदस्य डॉ. किशोर घोरमाडे ,प्रो.डॉ.आसावरी दुर्गे डॉ. राहुल वाघमारे ,डॉ. सुनील घुगल तायवाडे महाविद्यालयाचे समस्त शिक्षक वृंद उपस्थित होते. या उद्घाटन कार्यक्रमानंतर 'भारतीय युवक आणि डिजिटल साक्षरता' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या व्याख्यानसाठी प्रमुखवक्ते प्रा.डॉ. राजेंद्र वाटाणे आणि प्रा.डॉ. कोमल ठाकरे हे होते यांनी शिबिरार्थींना वरील विषयावर मार्गदर्शन केले. यानंतर राष्ट्रीय सेवा योजनेत सहभागी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले त्यामध्ये एकलनृत्य, समूह नृत्य, गीत गायन इत्यादी मध्ये सहभाग घेतला या उद्घाटकीय दिवसाचा समारोप राष्ट्र गीताने करण्यात आला.

आईचे देहदान करून डॉ.उमरकर यांनी समाजासमोर ठेवला आदर्श

लहान आर्वी ■ सुनिल साबळे

शांताबाई उमरकर यांचे अमरावती येथील डॉ. पंजाबराव मेडिकल कॉलेजला देहदान



लहान आर्वीः आष्टी येथील रहिवासी आणि सारवाडी येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे सेवानिवृत्त वैद्यकीय अधिकारी डॉ.प्रल्हाद उमरकर यांच्या मातोश्री शांताबाई भिमरावजी उमरकर यांचे दिवशी २७ जानेवारी रोजी चालता बोलता निधन झाले.त्यांचे वय ९३ वर्षाचे होते. मात्र शांताबाई उमरकर या स्मृतीने एकदम ठणठणीत होत्या.त्यांना पेपर वाचण्याचा दररोज छंद होता.शतक गाठतील अशी घरच्यांना आणि नातेवाईकांना आशा होती.मात्र सकाळी ब्रश करता करताच त्या खाली पडल्या आणि देवाघरी गेल्या.शांताबाई उमरकर यांनी मुलाजवळ आणि नातवाजवळ माझे देहदान करण्याचे बोलुन दाखवले होते. देहदान करावं ही शांताबाई यांची तीव्र इच्छा होती.

याच अनुषंगाने दोन वर्षांपूर्वी म्हणजेच २० मार्च २०२३ रोजी मुलगा डॉ.प्रल्हाद उमरकर यांच्या वाढदिवसानिमित्त शांताबाई उमरकर यांनी स्वतः सही करून देहदान करण्यासाठी फार्म भरला होता.त्यावेळी शांताबाई सोबतच १५ जणांनी सुध्दा एकाच वेळी देहदानासाठी फॉर्म भरले होते. त्यामुळे २७ जानेवारी रोजी सकाळी शांताबाई यांचा मृत्यू होताच मुलगा डॉ प्रल्हाद उमरखर ,नातु मनोज उमरकर आणि नातसुन प्रतिक्षा उमरकर यांनी देहदान करण्यासाठीची प्रक्रिया करण्यासाठी लगबग सुरू केली. आणि लेहेगाव येथील भाचा डॉ. धनंजय मा. तट्टे यांच्या सहकार्याने

अमरावती येथील डॉ.पंजाबराव देशमुख मेमोरियल मेडिकल कॉलेजची रूग्नवाहीका बोलावुन शेकडो आप्तेष्ट आणि नातेवाईकांचे उपस्थितीत अंत्यविधीचे सर्व सोपस्कार आणि देहदानासाठी लागणाऱ्या सगळ्या जबाबदाऱ्या पार पाडुन शांताबाई उमरकर यांचा देहदान करण्यात आला.

शांताबाई उमरकर यांनी आयुष्यभर नातेवाईक,गरजू, येणारे जाणारे सगळ्यांचीच मदत केली आहे. आणि आत्ता अखेरचा श्वास संपल्यानंतरही त्यांचा देह वैद्यकीय शिक्षण घेणाऱ्या प्रशिक्षणार्थींच्या शैक्षणिक सेवेसाठी कामी पडणार आहे. आईचा देहदान करण्याचा संकल्प पूर्ण केल्यामुळे उमरकर परिवाराने समाजात आदर्श निर्माण केला आहे.

साहित्यिक कवी नरेंद्र गुळघाने यांना ' महाराष्ट्र जीवन गौरव पुरस्कार ' जाहीर

तळेगाव शा.पंत ■ प्रतिनिधी



तळेगाव शा.पं.: ज्येष्ठ साहित्यिक कवी नरेंद्र गुळघाने तळेगाव (शामजी पंत)यांना मैत्री कट्टा कवी मनाचा साहित्य समुह महाराष्ट्र या महाराष्ट्रात आणि इतर प्रांतात अग्रेसर असलेल्या नामवंत साहित्य संस्थेचे वतीने साहित्य ,शिक्षण आणि समाजसेवा या कार्यासाठी दिला जाणारा साहित्य क्षेत्रातील कार्यास वाहीलेला महाराष्ट्र जीवनगौरव २०२५ हा पुरस्कार नुकताच जाहीर करण्यात आला,या पुरस्काराचे स्वरूप मानचिन्ह ,मानपत्र,मेडल शाल, श्रीफळ असे असून साहित्य, शिक्षण , समाजसेवा ,राजकीय या क्षेत्रातील मान्यवरांचे हस्ते ९फेब्रुवारी २०२५ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे या मैत्री कट्टा साहित्य समुह संघाच्या साहित्य संमेलनात तो प्रदान केला जाणार आहे.

नरेंद्र गुळघाने हे १९९० पासून साहित्य लेखन क्षेत्रात अग्रेसर असुन त्यांनी आजवर अनेक साहित्य संमेलनात महाराष्ट्रातील नामवंत साहित्यिक कवींचे समवेत सहभाग नोंदविला आहे,ते पस्तीस वर्षापासून सातत्याने लेखन करीत आहे,त्यांनी ३५६० चे वर निसर्ग,प्रेम ,सामाजिक,अध्यात्मिक या विषयावरील कविता ५५०;अभंग लेखन ,१८३ रवी सूर्य भास्कर या विषयावरील कविता,पारिजात फुललेला या अध्यात्मिक विषयाचे १५७ लेख ,५००० चे वर चारोळी लेखन,आणि७० चे वर ललित लेख इत्यादी लेखन केलेले आहे,ते सातत्याने साहित्य समूह ग्रुप,दैनिक,साप्ताहिक,अनियतकालिक मासिक,त्रैमासिक विशेषांक यामध्ये लेखन करीत असतात,अनेक प्रातिनिधिक काव्यसंग्रहात त्यांच्या कविता समाविष्ट आहे,त्यांनी सह्याद्री वाहिनीवरील विशुभाऊ बापट निर्माता असलेल्या शर्यत रे अपुली या काव्यभागात काम केलेले आहे,त्याचे अठरा भाग प्रसारित झालेले आहे,त्यामध्ये स्मिता तळवलकर,संगीतकार यशवंत देव ,ज्येष्ठ साहित्यिक नंदा केशव मेश्राम,विठ्ठल वाघ,ज्ञानेश वाकुडकर परीक्षक होते,इतर दोन साहित्यिकत्यांचे समवेत या प्रत्येक भागात होते,

ते आज विविध पदे भूषवित असुन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे वर्धा जिल्हा अध्यक्ष आहे,भारत बहुउद्देशीय शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष असून.मराठी साहित्य मंडळ मुंबई चे माजी वर्धा जिल्हा अध्यक्ष आहेत,यासह ते आज अनेक संस्थांचे पदाधिकारी आहेत,त्यांना महाराष्ट्र जीवनगौरव २०२४, महाराष्ट्र,भारतीय साहित्य जीवनगौरव २०२४, महाराष्ट्र समाजभूषण पुरस्कार २०२४,महाराष्ट्र काव्यभूषण पुरस्कार २०२४,महाराष्ट्र साहित्य भुषण पुरस्कार २०२४,वॉटर कप पुरस्कार २०१७-१८,आदर्श ग्रामसेवक पुरस्कार २००२-०३ ,ग्रामपंचायत दीला जाणारा राष्ट्रसंत स्वच्छग्राम स्पर्धा,वैराग्य मूर्ती संत गाडगेबाबा ग्रामअभियान पुरस्कार,महामहीम राष्ट्रपती यांचे शुभ हस्ते दिला जाणारा निर्मल ग्राम पुरस्कार २ वेळा

यासह अनेक पुरस्कार त्यांना समाजसेवा, ग्रामसेवा आणि साहित्य क्षेत्राकरिता आजवर मिळाले आहे.

यांचे पुढील दोन महिन्यात एकाच वेळी प्रेम,सामाजिक,आदिवासी,अध्यात्मिक,

निसर्ग या विषयावरील फुटपाथ,सृष्टी संपदा,भाव फुलांची ओंजळ,काव्यप्रेरणा,सामाजिक सरिता,तिच्या स्वप्नांचा पारिजात,निसर्ग सृष्टी यासह दहा काव्यसंग्रह प्रकाशित होत आहे.

पारिजात फुललेला हा अध्यत्मिक लेख संग्रह,स्मृती गंधाचे वाटेवर हा ललित लेख प्रकाशनाचे वाटेवर आहे.ते महाराष्ट्रातील वर्धा जिल्ह्यातील तळेगाव (शामजी पंत),ता.आष्टी येथील रहिवासी असुन ग्राम पंचायत अधिकारी म्हणून वर्धा जिल्यातील आष्टी येथे ३२ वर्षापासून कार्यरत आहे,ते ३१ अगस्त १ सप्टेंबर २०२४ ला तळेगाव (शामजी पंत),त.आष्टी,वर्धा येथे भरलेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद (पुणे) च्या वर्धा जिल्हा शाखेच्या वतीने भरविण्यात आलेल्या सतराव्या अखिल भारतीय महात्मा फुले प्रबोधन मराठी साहित्य संमेलनाचे ते मुख्य आयोजक आणि स्वागताध्यक्ष होते.ते सदैव साहित्यिक सामाजिक कार्यात अग्रेसर असतात. महाराष्ट्र जीवनगौरव २०२५ हा महाराष्ट्रातील सर्व क्षेत्रात असलेला मानाचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल सर्व अधिकारी वर्ग, ग्राम पंचायत अधिकारी,साहित्यिक,कवी,लेखक,सर्व संस्थांचे पदाधिकारी,रसिक बंधु भगिनी यांनी त्यांचे अभिनंदन केले असुन पुढील वाटचालीस त्यांना शुभेच्छा दिलेल्या आहेत,त्यांचेवर सर्व स्तरावरून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

वक्तृत्व स्पर्धेत आष्टी तालुक्यातून ईशांत कुरवाडे प्रथम;तर ब गटामधून अथर्व हमाने प्रथम

आष्टी (श)वर्धा ■ सुनिल मांडवे



आष्टी (शहीद): श्री समर्थ वाचनालय व लोकमान्य विद्यालय यांचे संयुक्त विद्यमाने स्वर्गीय शेषराव कृष्णराव राजकारणे स्मृती तालुकास्तरीय आंतरशालेय विद्यार्थ्यांची वक्तृत्व स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. ही स्पर्धा शनिवार दिनांक २५ जानेवारी २०२५ ला संपन्न झाली. या स्पर्धेकरिता आष्टी तालुक्यामधील शाळा आणि कनिष्ठ महाविद्यालय येथील विद्यार्थ्यांना निमंत्रित करण्यात आले होते. ही स्पर्धा दोन गटांमध्ये घेण्यात आली. शालेय गट आणि कनिष्ठ महाविद्यालयीन गट अशा दोन भागांमध्ये ही स्पर्धा आयोजित केली होती. वर्ग आठ ते दहा साठी शालेय जीवनात शिस्त व स्वच्छतेचे महत्त्व हा विषय तर ब गटात कुटुंब प्रबोधन काळाची गरज हा विषय होता. अ गटातून प्रथम क्रमांक लोकमान्य विद्यालय आष्टी येथील विद्यार्थी ईशांत कुरवाडे द्वितीय क्रमांक कुमारी भावना नेहारे स्वातंत्र्यवीर लोहे विद्यालय वडाळा तृतीय क्रमांक कुमारी दुर्गा मंगेश निशितकर लोकमान्य विद्यालय तसेच उत्तेजनार्थ पारितोषिक कुमारी आदिती बनसोड आणि कुमारी कल्याणी संतापे ज्ञानेश्वरी विद्यालय साहूर यांनी पटकावले. त्याचप्रमाणे ब गटामधून प्रथम पारितोषिक अथर्व रवींद्र हमाने लोकमान्य कनिष्ठ महाविद्यालय आष्टी तसेच द्वितीय पारितोषिक कुमारी श्रेया पाचघरे लोकमान्य कनिष्ठ महाविद्यालय तृतीय पारितोषिक कुमारी टिंगणे लोकमान्य कनिष्ठ महाविद्यालय तसेच उत्तेजनार्थ अथर्व धीरज जोरे हुतात्मा कनिष्ठ महाविद्यालय आष्टी व कुमारी दामिनी काळे ज्ञानेश्वरी कनिष्ठ महाविद्यालय साहूर यांनी पटकाविले. या कार्यक्रमासाठी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून श्री समर्थ शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष श्री सुभाष जी गुप्ता तसेच प्रमुख अतिथी म्हणून श्री समर्थ वाचनालयाचे अध्यक्ष श्री संजयजी देशपांडे तसेच प्राध्यापिका सौ खोंडे मॅडम व प्राचार्य श्री विजय राव दाभाडे यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन व परिचय लोकमान्य विद्यालयाचे शिक्षक श्री विनोद जी लोहकरे तसेच प्रास्ताविक माननीय श्री दाभाडे सर तसेच आभार प्रदर्शन लोकमत विद्यालयाचे शिक्षक श्री सुनील जी मांडवे यांनी केले. या स्पर्धेचे निरीक्षक म्हणून हुतात्मा विद्यालयाचे शिक्षक श्री वीरेंद्र जी कडू तसेच श्री समर्थ महाविद्यालयाचे प्राध्यापक श्री देवेंद्रजी खडकी हे होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री समर्थ वाचनालयाचे ग्रंथपाल श्री मोहन निंभोरकर, सुरेश बाराई, दिलीप दारोकार श्री प्रशांत पाटील शाळेतील शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व वाचनालय कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

काटोलात संत तुकाराम महाराज जन्मोत्सव; काटोल नरखेड तालुक्यातून नागरिक हजारोच्या संख्येने उपस्थित राहणार

काटोल ■ प्रशांत पवार

काटोल :- काटोल नगरीत जगद्गुरू संत तुकाराम महाराज जयंती सोहळा येत्या वतीने ०२ फेब्रुवारी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येणार आहे विशेष म्हणजे काटोल नरखेड तालुक्यातून या कार्यक्रमात हजारोंच्या संख्येने उपस्थित राहणार आहेत.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज जन्मोत्सव संत तुकाराम महाराज व्यापार संकुल येथे आयोजित करण्यात येत असून. अध्यात्म/विज्ञान या विषयावर व्याख्यान आयोजित केले आहे. कार्यक्रमाचे वक्ते कोमल ठाकरे तसेच कार्यक्रमाचे उद्घाटक चरणसिंग ठाकूर आमदार काटोल नरखेड विधानसभा.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अविनाश ठाकरे किसान सेवा संघ तसेच कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे पोलीस उपविभागीय अधिकारी बापू रोहम. उपविभागीय अधिकारी पियुष चिवंडे. मुख्याधिकारी धनंजय बोरीकर. पोलीस निरीक्षक निशांत मेश्राम. डॉ दिनेश डावरे वैद्यकीय अधीक्षक ग्रामीण रुग्णालय काटोल.रामदास गुंजरकर गटविकास अधिकारी. जावेद इक्बाल गटशिक्षणाधिकारी. तसेच अनेक मान्यवर काटोल तालुक्यातील विविध संघटनेचा यात सहभाग राहणार आहेत. तसेच भाविकांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहण्याचे आव्हान संत तुकाराम महाराज विचारमंच वतीने करण्यात आले आहे.

मनीष नगर परिसरातील वाहतुकीची समस्या सोडविण्यास मदत होणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



नागपूर ■ दिलीप येवले

मनीषनगर आरयूबीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण; केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन

नागपूर : मनीष नगरचा कनेक्टिव्हिटीचा प्रश्न हा गेल्या वीस ते पंचवीस वर्षापासून सतावतो आहे. त्यातून मार्ग काढण्यासाठी गेल्या काळात एका फ्लायओव्हरची निर्मिती या भागात करण्यात आली. मात्र त्यातून वाहतुकीची समस्या फारशी सुटली नाही. त्यामुळे केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या संकल्पनेतून ही दुसरी कनेक्टिव्हिटी आपण या भागात सुरू करण्याचा निर्णय घेतला. यातून या भागातील वाहतुकीची समस्या सोडविण्यास मदत होणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.

शहरातील सोमलवाडा (मनीषनगर) भागातील नागरिकांची वाहतूक कोंडीपासून सुटका करणा- या रेल्वे अंडर ब्रिजचे लोकार्पण आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले. यावेळी मुख्यमंत्री बोलत होते.

या कार्यक्रमाच्या लोकार्पणप्रसंगी वित्त राज्यमंत्री आशिष जयस्वाल, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) राज्यमंत्री इंद्रनील नाईक, आ .कृपाल तुमाने, व्यवस्थापकीय संचालक- महा मेट्रो श्रावण हर्डीकर, महानगरपालिका आयुक्त अभिजित चौधरी आदी यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते.

अतिशय आव्हानात्मक प्रकारचे हे काम होते. महा मेट्रोसह सर्वांनी चांगले काम केले आहे त्यातून ही कनेक्टिव्हिटी तयार झाली आहे. लवकरच मनीष नगरला जोडणारी तिसरी कनेक्टिव्हिटी ही आपण या भागात तयार करणार असल्याचे मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनीही यावेळी आपले विचार व्यक्त केले. आपण एक अंडरपास तयार केला होता. पण त्यातून समस्या सुटली नाही. म्हणून दुसऱ्या प्रकल्पाची योजना आखण्यात आली. नवीन अंडरपाससाठी जागेची निवड करण्यात आली आणि महामेट्रोकडे कामाची जबाबदारी सोपविण्यात आली. आता तिसराही उड्डाणपूल महाराष्ट्र सरकारने मंजूर केला आहे. हा उड्डाणपूल थेट हॉटेल रेडिसनजवळ उतरणार आहे. त्यामुळे भविष्यात मनीषनगर, बेसा, बेलतरोडी येथील नागरिकांची अधिक सोय होणार आहे. या भागात रेल्वेचे फाटक होते. पण १७० रेल्वे धावत असल्यामुळे नागरिकांना त्रास व्हायचा. आता नवीन अंडरपासमुळे हा त्रास दूर झाला आहे, असे केंद्रीय मंत्री गडकरी म्हणाले.

सोमलवाडा (मनीषनगर) येथील रेल्वे अंडर ब्रिजविषयी...

सोमलवाडा (मनीष नगर) आरयूबी प्रकल्पाचा एकूण खर्च ३३.८३ कोटी रुपये असून, आरयूबीची लांबी १९० मीटर, रुंदी ८ मीटर आणि उंची ४ मीटर आहे. आरयूबीचे निर्माण मुंबई-हावडा व दिल्ली-चेन्नई या निरंतर व्यस्त रेल्वे मार्गावर करण्यात आले आहे. या अंडर ब्रिजमध्ये पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र पादचारी मार्ग देखील उपलब्ध करण्यात आला आहे. आरयूबीमुळे मनीषनगर परिसर आणि वर्धा मार्ग यांच्यात चांगली कनेक्टिव्हिटी होईल. याचा मोठा फायदा मनीषनगर, बेसा, घोगली आणि बेलतरोडी येथील लाखो नागरिकांना होईल. रेल्वे फाटकामुळे होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळेल तसेच यामुळे या परिसरातील नागरिकांना वाहतूक कोंडीपासून मुक्ती मिळेल. तसेच मनीषनगर येथील रहिवाश्यांना वर्धा मार्गावर सहज प्रवेश मिळवता येईल. क्रॉसिंगवर होणारा जामचा त्रास दूर होईल आणि त्यासोबतच प्रवासात वेळेचीही बचत होईल.

राष्ट्रीय कापूस प्रकल्प समीक्षा सभा संपन्न

नागपूर ■ दिलीप येवले



नागपूर : भारत सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालय व वस्त्रोद्योग मंत्रालयच्या संयुक्त विद्यमाने कापूस प्रकल्प कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन टेक्सटाईल इंडस्ट्रीज (ण्ज्ळद्ण्ठै) मार्फत राबविला जात आहे. महाराष्ट्र मध्यप्रदेश, आणि राजस्थान या राज्यातील कापूस प्रकल्पाची समीक्षा सभा नागपूर येथील हॉटेल लिमिरिडिअन येथे .२२ जानेवारीला आयोजीत करण्यात आली होती. सभेच्या अध्यक्ष स्थानी कॉन्फेडरेशन ऑफ इंडियन टेक्सटाईल इंडस्ट्रीज दिल्ली चे अध्यक्ष राकेश मेहरा हे होते.

प्रमुख अतिथी टी राजकुमार अध्यक्ष, कापूस स्थायी समिती डॉ सीडी मायी अक्षध्य एस.ए.बी.सी. डॉ. वाय जी प्रसाद संचालक (सी.आय.सी.आ) डॉ. अरविंद वाघमारे संचालक, (कृषी मंत्रालय, डीओसीडी) प्रशांत मोहोता सीटी महाराष्ट्र कमिटी अध्यक्ष, श्रीमती चंद्रिमा चॅटर्जी (सेक्रटेरी जनरल सीटी) यांची प्रमुख उपस्थिती होती. आढावा सत्रामध्ये कृषी मंत्रालय एनएफएसएम च्या आर्थिक साहाय्याने राबविल्या जात असलेल्या अतिघन कापूस लागवड पद्धतीत कापसाच्या झाडाची संख्या पारंपरिक पद्धती पेक्षा तिप्पटीने वाढल्यामुळे कापसाचे उत्पादन वाढले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या उत्पादनात वाढ झाली आहे. सीटी चे अध्यक्ष राकेश मेहरा यांनी देशातील कापूस साखळीला या प्रकल्पा मुळे मोठी मदत होईल व कापूस क्षेत्राचा विकास होणार असल्याचे प्रतिपादन केले. टी. राजकुमार यांनी कापसाचे अधिक उत्पादन झाल्यास वस्त्रोउद्?द्योगस कापूस आयात करण्याची आवश्यकता राहणार नाही, असे प्रतिपादन केले. डॉ. वाय जी प्रसाद यांनी सी.आय.सी.आर कापूस प्रकल्प आठ राज्यात संचालीत करत आहेत. अतिधन कापूस लागवड पद्धतीमध्ये प्रकल्पाअंतर्गत कापसाचे उत्पादन वाढत आहे असे नमूद केले.

प्रशांत मोहोता यांनी सभेमध्ये उपस्थित असलेल्या वस्त्रोउद्?द्योगातील उपस्थित उ?द्योगपती, शास्त्रज्ञ, कापूस उत्पादक व कापूस क्षेत्रातील सध्या असलेली आवाहने व त्यावरील उपाय योजना यावर चर्चा केली. डॉ. अरविंद वाघमारे संचालक, कृषी मंत्रालय, देशातील आठही राज्यात या विशेष कापूस प्रकल्पाला शेतकऱ्याकडून चांगला प्रतिसाद मिळाला आहे असे प्रतिपादन केले.

सेक्रटेरी जनरल श्रीमती चंद्रिमा चॅटर्जी यांनी या प्रकल्पामुळे कापूस उत्पादकांना शाश्वत शेतीचे तंत्रज्ञान उपलब्ध झाले आहे असे प्रतिपादन केले.

वर्धा जिल्ह्यातील शेतकरी दिलीप पोहाणे यांनी प्रती एकरी २४ क्विंटल कापूस उत्पादन या प्रकल्पातून घेतले आहे. त्यांना व अन्य प्रगतिशील शेतकरी व प्रकल्पातील कापूस तज्ञांना पुरस्कृत करण्यात आला. याप्रसंगी सीआयसीआर, सीरकॉट, स्मार्ट कॉटन, श्रॅं यांचे प्रतिनिधी वस्त्रोउ?द्योग, कृषी विभाग, यातील शास्त्रज्ञ, अधिकारी व शेतकरी प्रामुख्याने उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन महाराष्ट्राचे प्रकल्प समन्वयक गोविंद वैराळे यांनी केले.

प्रजासत्ताक दिनाच्या मुहूर्तावर संपन्न झाला आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बॅडमिंटन कोर्ट्स चा उदघाटन सोहळा

वाई ■ प्रशांत थोरवे



वाई : वाई जिमखाना आणि किसन वीर महाविद्यालय, वाई यांच्या संयुक्त विद्यमाने क्रीडारसिकांसाठी आंतरराष्ट्रीय दर्जाचे आणि अद्ययावत सोयी-सुविधांनी सुसज्ज बॅडमिंटन कोर्ट्स चा लोकार्पण सोहळा सातारा जिल्हा बॅडमिंटन असो अध्यक्षा मा श्रीमंत छ. वृषाली राजे भोसले यांच्या शुभहस्ते, जनता शिक्षण संस्थेचे अध्यक्ष मा श्री मदनदादा भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला.

वाई सारख्या छोट्याश्या शहरात अंतर राष्ट्रीय दर्जाचे कोर्ट उभारणे ही कौतुकाची बाब असून वाई जिमखाना व किसनवीर महाविद्यालय वाई यांनी पुढाकार घेऊन हा प्रकल्प हाती घेतला व यशस्वीरीत्या पूर्ण केला याबाबत मा छ श्री वृषाली राजे भोसले यांनी विशेष कौतुक केले, व यामुळे अधिकाधिक खेळाडू घडतील व राष्ट्रीय, आंतर राष्ट्रीय स्तरावर यश संपादन करतील अशी खात्री देखील व्यक्त केली. तसेच स्व प्रतापराव भाऊ भोसले यांच्या स्वप्नातील हा हॉल सुसज्ज झाला असून अयोजकानी मा श्री छ वृषाली राजे भोसले यांच्याकडे दरवर्षी स्व प्रताप भाऊंच्या स्मरणार्थ जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धेचे आयोजन करण्यात यावे याबाबत व्यक्त केलेल्या इच्छेला संमती दिली.

२०१४ पासून या हॉल चे काम सुरू होते आणि वाई जिमखाण्याच्या नेतृत्वामुळे केवळ हे स्वप्न आज सत्यात उतरले आहे असे वक्तव्य कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री मदनदादा भोसले यांनी याठिकाणी व्यक्त केले.

किसनवीर महाविद्यालय विद्यार्थ्यांना शिक्षणा सोबतच त्यांच्यामध्ये असलेल्या सुप्तगुणाना वाव देण्यासाठी कायम प्रयत्नशील असतेच, या बॅडमिंटन हॉल ची उभारणी हे विद्यार्थ्यांना क्रीडा क्षेत्रात देखील नामलौकिक मिळावा यासाठी झालेली आहे, असे वक्तव्य किसनवीर महाविद्यालयाचे प्राचार्य यांनी आपल्या प्रास्ताविकात व्यक्त केले. वाई जीमखान्याचे अध्यक्ष श्री अमर कोल्हापुरे यांनी वाई जीमखान्याचे अंतर्गत सुरू होणाऱ्या या तिसऱ्या प्रकल्पाबाबत समाधान व्यक्त केले. संस्थेचे संस्थापक स्व आनंद कोल्हापुरे यांचे सशक्त ऱ सुदृढ पिढी घडविण्याचे उद्दिष्ट या कोर्ट च्या उभारणी मुळे पुन्हा एकदा सफल झाले आहे व या कोर्ट मुळे वाई च्या क्रीडा यशात नक्कीच वाढ होणार व बॅडमिंटन खेळात दर्जेदार खेळाडू घडणार असल्याची खात्री त्यांनी याठिकाणी व्यक्त केली, सर्व वाईकर क्रीडाप्रेमी यांनी याचा नक्की लाभ घेण्याचे आवाहन देखील त्यांनी यावेळी व्यक्त केले. तसेच या उभारणी मध्ये ज्यांनी सहकार्य केले असे श्री राजे महाडिक श्री शिरीष देशपांडे, श्री अविनाश रनसिंग, श्री रणवीर गायकवाड, श्री माजगावकर, श्री मनोज कान्हेरे, श्री निलेश फणसळकर, श्री समीर पवार, श्री मनोज शिंदे, श्री गजानन जाधव, श्री सचिन चव्हाण, श्री मदन जाधव यांचेदेखील आभार व्यक्त केले. या कार्यक्रमास वाई जिमखान्याचे उपाध्यक्ष ?ड रमेश यादव, सचिव श्री सुनील शिंदे, कोषाध्यक्ष डॉ मंगला अहीवले, संचालक श्री वैभव फुले, श्री शैलेंद्र गोखले, श्री नितीन वाघचौडे, श्री अमीर बागुल, सौ प्रीती कोल्हापुरे, श्री आनंद डूबल, श्री तुकाराम जेधे हे उपस्थित होते. रंगता बेडेकर यांनी सूत्रसंचालन तर कार्यक्रमाची सांगता सौ मनीषा घैसास यांनी वंदे मातरम् सादर करून केली.

अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल आयएसएमपी कडून अभिनंदन

वर्धा ■ प्रतिनिधी



वर्धा : अरण्यऋषी मारुती चितमपल्ली यांना भारत सरकारने पद्मश्री पुरस्कार जाहीर केल्याबद्दल इंटलेक्चुअल सोसायटी ऑफ मीडिया प्रमोटर (आयएसएमपी) संस्थेने चितमपल्ली यांचे अभिनंदन केले आहे.

प्रजासत्ताक दिनाच्या पूर्वसंध्येला केंद्र सरकारकडून पद्म पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. देशातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार मिळाले आहेत. यात चितमपल्ली यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाला आहे. वन संरक्षण, विकास आणि संशोधन या क्षेत्रात ते सहा दशकांपासून कार्यरत आहेत. ते वर्धेतील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात तीन वर्षांहून अधिक काळ वास्तव्यास होते.

मारुती चित्तमपल्ली यांनी वन खात्यात ३६ वर्षे सेवा केली आहे. त्यांनी १९७५-७६ या वर्षात गोंदिया जिल्ह्यातील नवेगाव राष्ट्रीय उद्यानाचा विकास केला. सुप्रसिद्ध पक्षीतज्ज्ञ सलीम अली यांच्या सहकार्याने त्यांनी कर्नाळा पक्षी अभयारण्य विकसित करण्यात मोलाची कामगिरी बजावली आहे. आतापावेतो ५ लाख किमी एवढी भटकंती करुन त्यांनी वृक्ष, पक्षी, प्राणी यांची माहिती गोळा केली व साहित्य तसेच जंगल अनुभवांवर २३ पुस्तके लिहिली. १३ बोली-भाषांचे जाणकार चितमपल्ली यांनी आदिवासी व इतर जमातींशी संवाद साधत अत्यंत दुर्मिळ माहितीचा खजिना संकलित करून मराठी साहित्य विश्वात एक लाखाहून अधिक शब्दांची भर घातली. सोलापूर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. त्यांच्याकडे अनेक वर्षांपासूनच्या दैनंदिनी असून त्यात विविध प्रकारच्या नोंदी करुन ठेवल्या आहेत. त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र सरकारने तसेच अनेक सामाजिक संस्थांनी त्यांना सन्मानित केले आहे. तीस हून अधिक पुरस्कार त्यांना मिळाले आहेत. त्यांनी पक्षिकोश, प्राणिकोश व मत्स्यकोश लिहून कोश निर्माण कार्यात मोठा ठसा उमटवला आहे. त्यांना पद्मश्री पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल त्यांचे वन्य जीव संरक्षक व आय एस एम पी चे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष कौशल मिश्र, डॉ. राजेन्द्र जैन, बी एस मिरगे, एड. नीलकंठ हूड, एड. ताम्रध्वज बोरकर, यशवंत भांडेकर, नीलिमा मुनोत, अनिल पोखरे, दिव्या, प्रिया यांनी अभिनंदन केले आहे.

विरुळ येथे ठिकठिकाणी ध्वजारोहण

विरुळ (आ.) ■ विनोद महाजन



विरुळ आकाजी : विरुळ येथे ग्रामपंचायत कार्यालयात प्रशासक अधिकारी वढाळ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी ग्रामविकास अधिकारी पीपी खंडागळे, पत्रकार विनोद महाजन, तंटामुक्ती अध्यक्ष महिंद्रा बुराडे, नितीन पोलखडे, कैलाश उपासे डॉ सोनवणे मॅडम, कृषी सहायक नासने मॅडम, तलाठी माळोदे मॅडम, छोटु मेश्राम, अविनाश तेलंगे, सूरज बेदूरकर, संदीप इंगळे, निलेश वानखेडे, शंकरराव देव्हारे, इंदिराबाई माकोडे, उईके, अंगणवाडी सेविका, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी व इतर मान्यवर गावातील नागरिक उपस्थित होते

भारतीय स्टेट बँक शाखा विरुळ येथील बँक व्यवस्थापक बंडू देवकर यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी बँकेचे अमोल काळे, पत्रकार विनोद महाजन, अलंकार खोब्रागडे, वैभव देशमुख, सूरज सहारे, योगेश जाधव, महिंद्रा बुराडे, व गावातील नागरिक उपस्थित होते

नेहरू विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय विरुळ येथे शाळेचे अध्यक्ष नरेंद्रसिह धंदोरीया यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले यावेळी शाळेचे उपाध्यक्ष पृथ्वीराज धंदोरीया, मुख्याध्यापक नितीन गवारकर, माजी शिक्षक अळसपूरकर सर, सुरेश चाफले, पत्रकार विनोद महाजन, कैलाश उपासे, माळोदे मॅडम, संदीप देऊळकर, जुमडे, व इतर मान्यवर, शिक्षक, शिक्षिका, विद्यार्थी उपस्थित होते

मॉडेल हायस्कूल, पशु वैद्यकीय दवाखाना, प्राथमिक कन्या शाळा, प्राथमिक केंद्र शाळा, अंगणवाडी, कृषी विकास गुणन प्रक्षेत्र इत्यादी ठिकाणी ध्वजारोहण करण्यात आले

मोर्वे येथे ग्रामविकास उपआयुक्त विजय मुळीक यांच्या उपस्थितीत प्रजासत्ताक दिन उत्साहात



खंडाळा ■ गणेश गुरव

खंडाळा: २६ जानेवारी २०२५ रोजी भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन सर्वत्र उत्साहात साजरा करण्यात आला. त्याचप्रमाणे खंडाळा तालुक्यातील मोर्वे येथे प्रजासत्ताक दिनानिमित्त पुणे विभागाचे ग्रामविकास विभागाचे उपायुक्त श्री विजयराव मुळीक यांनी भेट दिली. मोर्वे गावच्या दौऱ्यामध्ये विजय मुळीक यांनी गावातील विकास कामांचा आढावा घेऊन त्याची पाहणी केली. उपायुक्त यांनी ग्रामसभेला उपस्थित राहून माझी वसुंधरा, गावातील पाणीपुरवठा या बरोबरच ग्राम विकासाच्या विविध विषयांवर सखोल चर्चा केली. उपायुक्त विजय मुळीक यांनी मोर्वे ग्रामपंचायतीच्या सर्वच कामकाजा बाबत समाधान व्यक्त केले.

यावेळी नवनिर्वाचित सरपंच सौ. सुवर्णा काश्वेद, ग्रामसेवक गोरे मॅडम यांच्यासह ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ उपस्थित होते.

न्यू इंग्लिश स्कूल शिरोली बु मध्ये प्रजासत्ताक दिन उत्साहात

पुणे ■ सचिन थोरवे



पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या न्यू इंग्लिश स्कूल शिरोली बु? विद्यालयात स्वतंत्र भारताचा ७६ वा प्रजासत्ताक दिन मोठया उत्साहपूर्ण वातावरणात साजरा झाल्याची माहिती विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री . प्रसाद हांडे यांनी सांगितले .विघ्नहर सहकारी साखर कारखाचे अध्यक्ष श्री . सत्यशिलदादा शेरकर यांच्या हस्ते ध्वजारोहन करण्यात आले .विद्यालयाच्या स्काऊट आणि गाईडच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक संचलन करून राष्ट्रीय ध्वजास मानवंदना दिली . गावातील माजी सैनिक श्री . ज्ञानदेव रामभाऊ थोरवे , श्री . सोपान किसन शेरकर , श्री . राजाराम बाबुराव थोरवे , श्री . गुलाब शंकर शेरकर यांच्या हस्ते ' स्वातंत्र्य सैनिक स्मृती कोनशीला पूजन ' करण्यात आले . अतिशय भारावलेल्या स्वरात स्वातंत्र्य सैनिकांनी ' भारत माता की जय ' , ' वंदे मातरम ' च्या घोषणा दिल्या . घोषणांनी संपूर्ण परिसर भारावून गेला . 'संविधान प्रतिज्ञा 'व 'स्काऊट गाईड प्रतिज्ञा 'वाचन विद्यार्थ्यानी केले . प्रस्तावना श्री . प्रसाद हांडे तर स्वागत सांस्कृतिक विभाग प्रमुख रामचंद्र अय्यर यांनी केले . ग्रामस्थांच्या कायम ठेवीतून येणाऱ्या व्याजातून या प्रसंगी मान्यवरांच्या हस्ते बक्षिस वितरण करण्यात आले . अंगणवाडी , प्राथमिक शाळा , माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी नेत्रदिपक असे सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले . विघ्नहर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष श्री . सत्यशिलदादा शेरकर यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले . या प्रसंगी सरपंच प्रदिपशेठ थोरवे , उपसरपंच वैशाली थोरवे , तंटामुक्तीचे अध्यक्ष सुधीर देवणे , शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सुनिल विधाटे, शिक्षक पालक संघ उपाध्यक्ष सचिन थोरवे, पोलिस पाटिल अमोल थोरवे , नंदूशेठ शेरकर , डॉ .बी.व्ही . राऊत , हरिश्चंद्र जगताप आदी मान्यवर उपस्थित होते . आभार जनार्दन खेडकर यांनी मांडले .

भारत राष्ट्र निर्माण हाच प्रजासत्ताकाचा उद्देश : सुरज कदम

विरुळ (आ.) ■ विनोद महाजन



विरुळ आकाजी : सालफळ दि २६ जाने आपण प्रजासत्ताकाचा अमृत महोत्सव साजरा करत आहोत. सारा देश आपल्या वास्तविक जन्माचा महोत्सव साजरा करत असताना भारत राष्ट्र निर्माण हे आपल्या संविधान सभेने ठेवलेले उद्देश मात्र वर्तमान राजकीय, सामाजिक आणि आर्थिक संस्था सपशेल विसरल्या आहेत. धर्माच्या विभाजनाने दुभंगणाऱ्या देशात संविधानाच्या निर्माणकर्त्यांच्या स्वप्नातील मानवी मूल्यांवर आधारीत राष्ट्र निर्माण करुन इथल्या प्रत्येक नागरिकाने विश्वाच्या पुनर्रचनेसाठी सिध्द झाले पाहिजे हाच

प्रजासत्ताक राष्ट्राचा उद्देश आहे असे प्रतिपादन उच्च प्राथमिक शाळा, सालफळ येथे आयोजित ७६ व्या प्रजासत्ताक दिनाच्या कार्यक्रमात सालफळ येथील सरपंच मा. सुरज कदम यांनी केले. राष्ट्र ही अमूर्त संकल्पना असून देशातील राजकीय नेतृत्वाच्या दूरदर्शी सम्यक मूल्याधिष्ठित उद्देशाने आणि राष्ट्राप्रति असणाऱ्या त्याग समर्पण आणि निष्ठांनी राष्ट्र निर्माण संभव होते. त्यासाठी उद्देश आणि धोरण ठरवण्याची गरज असते. आपल्या देशातील राज्यकर्त्यामध्ये याचा प्रकर्षाने अभाव आढळतो असे प्रतिपादन प्रमुख वक्त्या मान. ज्योती धार्मिक यांनी केले.

शाळेत राष्ट्रध्वजाला मानवंदना दिल्यावर सांस्कृतिक कार्यक्रम सादर करण्यात आले.

यावेळी मंचावर शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मान. किशोर ढाणके, छायाताई मारबदे, उपसरपंच वानिताताई मेश्राम, तंटामुक्तीचे प्रमोदराव काळे आणि अरूणराव वानखेडे उपस्थित होते.

मंचावर समयोचीत विद्यार्थ्यांची भाषणे झालीत. सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. प्रास्ताविक राजेश इंगोले यांनी तर आभार शाळेचे मुख्याध्यापक संजय शेळके यांनी मानले.

कोरेगावात महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झालेल्या आचल मनोज आगरवाल या महिला खेळाडूच्या हस्ते ध्वजवंदन !;सरपंच संदीप ढेरंगेंनी स्वतःचा ध्वजारोहणाचा मान दिला खेळाडूंना!

वाघोली (पुणे) ■ स्वरुप गिरमकर



(पुणे) वाघोली : एकीकडे ध्वजारोहणाचा मान पानावरून गावोगावी राजकारण चालू असताना कोरेगाव भीमा (ता. शिरूर)येथील ग्रामपंचायतीचे सरपंच संदीप ढेरंगे यांनी मात्र प्रजासत्ताक दिनी स्वतःचा ध्वजवंदनाचा मान महाराष्ट्र राज्य महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झालेल्या आँचल मनोज आगरवाल या गावातीलच गुणी खेळाडूंना देत समाजासमोर आदर्श घालून दिला आहे.

कोरेगाव भीमा येथे ध्वजारोहण प्रसंगी गुणवंतांचा गुणगौरव व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन प्रजासत्ताक दिनानिमित्त करण्यात आले होते. यावेळी त्यानंतर अण्णासाहेब मगर बँकेचे संचालक राजाराम ढेरंगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सत्कार सोहळ्याला ग्रामपंचायतीच्या आजी-माजी पदाधिकाऱ्यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमात १८४ गुणवंत विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षक व गावातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या गुणवंताचा सत्कार ग्रामपंचायतच्या वतीने करण्यात आला. यावेळी सरपंच संदीप ढेरंगे, उपसरपंच सविता घावटे, ग्रामपंचायत सदस्य अमोल गव्हाणे, केशव फडतरे, महेश ढेरंगे, गणेश कांबळे शरद ढेरंगे, अनिकेत गव्हाणे, वंदना गव्हाणे, मनीषा गव्हाणे, जयश्री गव्हाणे, कोमल खलसे, शिल्पा फडतरे, ग्राम पंचायत अधिकारी श्रीकांत वाव्हळ यांच्यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व ग्रामस्थ मोठ्याप्रमाणात उपस्थित होते.

या प्रसंगी गुणवंताचा फेटा, गुलाबपुष्प व सन्मानचिन्ह देऊन सन्मान करताना हा आपल्या आयुष्यातील अत्यंत आनंदाचा क्षण असल्याची भावना अनेकांनी व्यक्त केली. तर यावेळी सांस्कृतिक कार्यक्रमातही देशभक्ती गीतापासून आपली कला संस्कृती, परंपरा, ऐतिहासिक वारसा यांचे दर्शन घडले. माजी सरपंच विजय गव्हाणे यांनी प्रास्ताविक केले, तर ग्रामपंचायत सदस्य महेश ढेरंगे व श्री. सातपुते सर यांनी सूत्रसंचालन केले.

सरपंच संदीप ढेरंगेंनी स्वतःचा ध्वजारोहणाचा मान दुसऱ्यांना देणे अभिमानास्पद

तुमचे क्षेत्र कोणतेही असो समर्पण, मेहनत व जिद्दीच्या जोरावर यश नक्कीच मिळते. एकीकडे ध्वजारोहणाच्या मानपानावरून राजकारण चालू असताना गावच्या वतीने सरपंच संदीप ढेरंगे यांनी स्वतःचा ध्वजारोहणाचा मान मला देत समाजासमोर आदर्श निर्माण करत हा क्षण आम्हा खेळाडूंच्या दृष्टीने अभिमानाचा असल्याचे महाराष्ट्र राज्य महिला क्रिकेट संघाच्या कर्णधारपदी निवड झालेल्या आँचल मनोज आगरवाल यांनी सांगितले.

जय महाराष्ट्र मंडळाने जपली सामाजिक बांधिलकी

गावातील गांधी चौकातील जय महाराष्ट्र तरुण मंडळाच्या वतीने आर्चरी प्रकारात नॅशनल चॅम्पियन असलेले गावातील तुषार संजय फडतरे यांच्यासह दिव्या संपत गव्हाणे व महिला क्रिकेटच्या महाराष्ट्राच्या अध्यक्ष आँचल मनोज आगरवाल यांच्या हस्ते ध्वजारोहण करून सामाजिक बांधिलकी जपण्याचे काम केले आहे.

नामदार मकरंद पाटील यांच्याकडून पसरणी गावातील केळघने कुटुंबीयांना ५१ हजार रुपयाची तातडीची मदत

वाई ■ प्रशांत थोरवे



मागील काही दिवसांपूर्वी पसरणी येथे दुर्घटनाग्रस्त झालेल्या केळघने कुटुंबाला महाराष्ट्र राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री व वाई खंडाळा महाबळेश्वर मतदार संघाचे लोकप्रिय लोकप्रतिनिधी ना. मकरंद लक्ष्मनराव जाधव पाटील (आबा)यांनी त्वरित वैयक्तिक रोख ५१०००/- हजार रुपयांची मदत केली.

अत्यंत संवेदनशील मनाचे आणि आपल्या मतदारसंघातील प्रत्येक नागरिकाच्या सुखदुःखात सहभागी होणारे मकरंद आबा हे वाई, खंडाळा, महाबळेश्वर मतदार संघाला लाभलेलं एक संवेदनशील नेतृत्व आहे आणि म्हणूनच जनमानसात जननायक या उपाधीने देखील त्यांना संबोधले जाते. आबांनी दिलेल्या तातडीच्या मदतीमुळे सदर कुटुंबास मोठा दिलासा मिळाला आहे. तसेच शासनाकडून मदत देण्याचे आश्वासन नामदार मकरंद आबा पाटील यांनी सदर कुटुंबाला दिले आहे.

ही आर्थिक मदत आबांनी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे वाई तालुका पश्चिम भागाचे युवा नेते सन्माननीय आनंद बाळासाहेब चिरगुटे यांच्या करवी सदर कुटुंबास दिली. यावेळी पसरणी गावच्या सरपंच हेमलता अशोक गायकवाड तसेच वाई कृषी उत्पन्न बाजार समितीचे उप सभापती विलास बापू येवले, वाई खरेदी विक्री संघ माजी चेअरमन बाजीराव भाऊ महांगडे, युवा नेते स्वप्निल अशोकराव गायकवाड, युवा नेते व उद्योजक गौरव महांगडे (कारभारी), युवा उद्योजक विक्रांत महांगडे, पसरणी विकास सोसायटी माजी चेअरमन संपत बापू महांगडे, माजी उप सरपंच विशाल शिर्के, माजी पंचायत समिती सदस्य राजेश शिंदे, सूतगिरणीचे माजी व्हॉइस चेअरमन धर्माजी शिर्के बापू, उप सरपंच ग्रामपंचायत पसरणी बद्रीनाथ महांगडे, युवा उद्योजक टी अँड टी कन्स्ट्रक्शन सातारा प्रमुख नवनाथ येवले, माजी सरपंच प्रमोद महांगडे, उद्योजक संजय(अप्पा)कांबळे, जीवन आधार पतसंस्था संचालक बाजीराव नथू महागडे(कारभारी) युवा उद्योजक दीपक शिर्के, पुणे डीएस कन्स्ट्रक्शन पसरणी देवालय ट्रस्ट अध्यक्ष रोहिदास आबा शिर्के, उद्योजक दिलीप महांगडे भैरवनाथ नगर, माजी सभापती पंचायत समिती वाई किसनराव गायकवाड, माजी चेअरमन पसरणी विकास सेवा सो. भगवान महांगडे पाटील, विकास सेवा सो. तज्ञ संचालक किशोर महांगडे, पसरणी. विकास. सेवा सो. सदस्य संतोष चौधरी, उद्योजक केतन मराठे, संदीप शिंदे व पसरणी ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. आबांनी केलेल्या या तातडीच्या मदतीबद्दल पसरणी ग्रामस्थांकडून तसेच वाई तालुक्याच्या पश्चिम भागातील सर्व कार्यकर्त्यांकडून ना. मकरंद आबा पाटील यांचे विशेष आभार मानण्यात आले.

कवयित्री सुषमा कळमकर अष्टपैलू राज्यस्तरीय साहित्यरत्न गौरव पुरस्काराने सन्मानित



नागपूर ■ दिलीप येवले

नागपूर : सामाजिक कार्यकर्ती कवयित्री लेखिका मा. सुषमा कळमकर यांना अष्टपैलू सांस्कृतिक कला अकॅडमी मुंबई तसेच न्याय प्रभात वृत्तपत्र यांच्या संयुक्त विद्धमाने अष्टपैलू राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. २९ डिसेंबर २०२४ रोजी पुणे (आळंदी) सुवर्णकार सभागृहात जागतिक कीर्तीचे ज्येष्ठ साहित्यिक विश्वगुरू मधुसूदन घाणेकर तसेच अष्टपैलू अकॅडमीं संस्थेचे अध्यक्ष शिवाजी खेरे, ह.भ.प प्रल्हाद सुपेकर महाराज, अल्का झरेकर, अरुणा कालेलकर मॅडम, न्याय प्रभात वृत्तपत्र अध्यक्ष अनुसया खेरे यांच्या शुभ हस्ते साहित्य क्षेत्रातील मानाचा अष्टपैलू राज्यस्तरीय साहित्यरत्न पुरस्कारा ने सन्मानित करण्यात आले. सुषमा कळमकर यांनी सतत चार वर्ष खंड न पडता अक्षरमंच काव्य लेखन स्पर्धा मध्ये तसेच वृत्तपत्र न्यायप्रभात मध्ये सर्वोत्कृष्ट काव्यलेखन केल्याबद्दल हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. नागपूरच्या सर्व कवी कवयित्री, मित्र मैत्रिणींनी त्यांच्यावर शुभेच्छा चा वर्षाव केला.

जनप्रभात हे दैनिक पत्र मालक, प्रकाशक, मुद्रक : संपादक राहुल ज्ञानेश्वरराव गजरे यांनी रुतुजा प्रिंटर, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे मुद्रीत करुन साप्ताहिक जनप्रभात कार्यालय, नवीन आष्टी ता.आष्टी जि.वर्धा ४४२२०२ येथे प्रसिध्द केले. भ्रमणध्वनी ७८७५६१३६१९ (या पत्रकातील सर्व माहितीशी संपादक, मालक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद वर्धा न्यायालयांतर्गत) RNI NO : MAHMAR/2022/82242